ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

एप्रिल २०१३ • मूल्य १० रु.

## मनाचे कवडसे पुस्तकाचे प्रकाशन



पुस्तकाचे प्रकाशन करताना
विवेक सावंत, डॉ. शिरीषा साठे,
शरद ठाकरे, डॉ. प्रमोद सलगरकर,
चंद्रिका चौहान, लेखक विश्वास काकडे,
अरुणा बुरटे आणि अलका काकडे



## जागतिक पुस्तकदिन आणि मराठी ग्रंथविश्व...

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने








## ग्रंथप्रदर्शन क्षणचित्रे












**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**एप्रिल २०१३, वर्ष ३१ वे**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

२३ एप्रिल हा जागतिक पुस्तक दिवस. तो लक्षात घेऊन हा अंक साहित्यविषयक बेतला आहे.


दुष्काळी महाराष्ट्रात वाघिणीतून पाणी पोचेल की नाही, माहीत नाही, पण 'वाघिणीच्या दुधा'चा प्रभाव मात्र सर्वत्र पोचलाय. त्यातून आलेली संस्कृती अशी भिनत चालली आहे, की ज्ञानार्थी मराठी पोटार्थी होऊ लागली आहे. पन्नास रुपयांच्या 'लाट का माल'नं मराठी साहित्य घराघरात पोचवून वाचकांची ग्रंथसंपदा व विक्रेत्यांची संपदा वाढत आहे. व्यवसाय आहे, मग यात गैर काय, हा प्रश्न येतो कुठे! मराठी पुस्तक विकत घ्यायला लागलेल्या रांगा अद्भुत आहेत. एका प्रादेशिक भाषेतील पुस्तकांसाठी लागणाऱ्या या रांगेच्या लांबीची नोंद गिनिज बुकातही होईल कदाचित. ज्या विक्रेत्याचं नाव त्यात झळकेल, तो ते गिनिज बुकही पन्नास रुपयांत विकून घराघरात जाईल.

मराठी साहित्याची भूमी फोफावत आहे. त्याची सकस आणि फास्टफूडमधल्या विरोधाची स्थिती झाली आहे. सेल्फ मार्केटिंग करणारे साहित्यिक म्हणून मान्यता पावत आहेत. नेटवरील माहितीचं संकलन करणारे प्रतिथयश लेखक झाले आहेत. विदर्भ–मराठवाडा–खानदेश इथं जे साहित्य फुलतं, त्याची चव आम्हाला मिळतच नाही. त्यांच्या नशिबी इथेही अनुल्लेखच येतो.

या अंकात अशा काही अनुल्लेखित उल्लेखनीयांची नोंद प्रा. अजय देशपांडे घेत आहेत. चरित्रकार धनंजय कीर जन्मशताब्दीच्या औचित्यानं त्यांच्या कार्याचा आढावा डॉ. श्रीकांत परळकर यांनी घेतला आहे. प्रभाकर वाईरकरांनी कार्टूनिस्ट केशव (वेकंट राघवन) यांची ओळख करून दिली आहे, तर रविराज गंधे यांचं 'भिरभिरं' राजकारणी आणि साहित्याचा परामर्श घेत आहे. अपर्णा पाटील यांनी दोन परदेशी पुस्तकांचं परीक्षण केलं आहे. एक पुस्तकवेडा गेली ४० वर्षं निरलसपणे ग्रंथव्यवहार करतो आहे. महाराष्ट्रातील एके काळी लहान गाव असलेल्या अशा कल्याण परिसरात 'ग्रंथोपजीविये' व्रत पाळून आहे, त्याची 'श्रीमंती' काय हे सुनंदा मोने सांगत आहेत.

**– कार्यकारी संपादक**

## डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित व संपादित केलेल्या 'बोल महामानवाचे' आणि 'रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन या संग्राह्य ग्रंथत्रिवेणी




महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रगाढ विद्वत्तेचे, त्यांच्या प्रकांडपांडित्याचे दर्शन घडते ते त्यांच्या कालानुरूप केलेल्या ओजस्वी आणि मर्मभेदी भाषणांतून. युवाशक्तीसाठी प्रेरक, कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक, राजकारण्यांसाठी दिशादर्शक आणि सर्व समाजासाठी उद्‌बोधक ठरलेली त्यांची ही भाषणे म्हणजे आंबेडकरी विचारांचा मोलाचा ठेवा आहे. त्या एकूण एक, म्हणजे ५३७ (मराठी, इंग्रजी, हिंदी आणि गुजराती) भाषणांची समग्रसूची कालक्रमानुसार पहिल्यांदाच या ग्रंथत्रिवेणीत सादर करण्यात आली आहे. त्यापैकी केवळ इंग्रजीत आजवर उपलब्ध असलेल्या भाषणांचा अनुवाद करून, तब्बल ५०० भाषणे संपूर्णपणे मराठीत आणि तीदेखील विषयवार आणि कालानुक्रमे, संगतवार मांडणी करून या ग्रंथत्रिवेणीत सादर करण्यात आली आहेत. अशा पद्धतीचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

खंड एक – आत्मनिवेदन, अनुयायी मार्गदर्शन आणि समग्र भाषणसूची
खंड दोन – सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि कायदा–संविधान
खंड तीन – राजकीय

**'बोल महामानवाचे' – जनआवृत्ती संच**
**मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत अधिक टपाल खर्च १०० रु.**

---




**'रवींद्रनाथ टागोर'**
**डिलक्स आवृत्ती संच**
**मूळ किंमत १२०० रु.**
**सवलतीत ८०० रुपयांत**
**अधिक टपाल खर्च १०० रु.**



# सव्यसाची चरित्रकार – धनंजय कीर

## डॉ. श्रीकांत परळकर

महाराष्ट्रात विष्णू नारायण भातखंडे यांनी 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' खंडांची निर्मिती करून संगीतक्षेत्रात एकमेव लँडमार्क निर्माण करून ठेवला. रियासतकार सरदेसाई यांचे रियासतींवरील लेखन; तसेच इतिहासाचार्य राजवाडे यांचीही कामिगिरी इतिहासक्षेत्रात तितकीच अतुलनीय ठरली आहे. जेव्हा चरित्रलेखन, चरित्रलेखक यांच्याविषयी विवेचन किंवा चर्चा होते तेव्हा चरित्रकार अनंत विठ्ठल कीर ऊर्फ धनंजय कीर यांचे नाव अग्रक्रमाने घेणे क्रमप्राप्त ठरते. एखाद्या व्यक्तीचे चरित्र म्हणजे त्या व्यक्तीच्या जीवनातील संपूर्ण जीवनाची, तिच्या जीवनातील विशिष्ट प्रसंग व कालखंड यांची, कहाणी होय. चरित्रलेखकास वस्तुनिष्ठ राहून, प्रत्यक्ष घडलेल्या घटना, प्रसंग, विचारप्रवाह तसेच पुरावे यांच्याशी प्रामाणिक राहूनच चरित्रलेखन करायचे असते. इतिहास संशोधकाप्रमाणे चरित्रलेखकासुद्धा गौणप्रधान अशा सर्व प्रकारची साधने गोळा करून, त्यांची निवड आणि सुसंगत मांडणी करून चरित्रनायकाच्या जीवनाच्या पार्श्वभूमीवर व्यक्तिदर्शन घडवायचे असते. चरित्र हे व्यक्तिप्रधान असले तरी ते सामाजिक व सांस्कृतिक इतिहासापासून वेगळे करता येत नाही. तदनुसार, चरित्रलेखनास इतिहासाची एक शाखा म्हणणे उचित ठरते. इतिहासाची पार्श्वभूमी किती प्रमाणात ठेवायची आणि समकालीन घटनांचा व विचारप्रवाहांचा उपयोग किती प्रमाणात करायचा याचे उत्कृष्ट तारतम्य ठेवून कीर यांनी लोकविलक्षण प्रतिभेने चरित्रलेखन केले असल्याने त्यांचा या क्षेत्रात ठळकपणे ठसा उमटलेला आहे हे निर्विवाद. चरित्रवाङ्मयात कीर यांनी केलेल्या मोलाच्या योगदानाचे स्मरण 'धनंजय कीर जन्मशताब्दी' वर्षाच्या अखेरच्या टप्प्यात प्रकर्षाने होते.



**चरित्रकार धनंजय कीर**

२३ एप्रिल १९१३ रोजी रत्नागिरी येथे (अनंत) धनंजय कीर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील विठ्ठल आणि आई देवकी जवळजवळ अशिक्षित होते. रत्नागिरीच्या शिल्पशाळेत प्राथमिक आणि पुढे तेथेच सुतारकामाचे शिक्षण पूर्ण केल्याने वडिलांच्या पारंपरिक सुतारकीच्या व्यवसायास त्यांना जमेल तसा हातभार लावता आला. शिल्पशाळेत शिकत असताना कीर यांना बक्षिसे, प्रमाणपत्रे आणि शिष्यवृत्तीही मिळाली. त्यांचे माध्यमिक शिक्षण काही काळ (एक वर्ष) पटवर्धन मिडल स्कूलमध्ये झाले. त्याच सुमारास म्हणजे १९३० साली स्वातंत्र्यवीर सावरकरांचे व्याख्यान ऐकण्याची संधी कीर यांना मिळाली आणि कदाचित तेव्हापासूनच त्यांच्यावर सावरकर विचारसरणीचा प्रभाव पडण्यास सुरुवात झाली असावी. रत्नागिरी हायस्कूलमधून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून ते १९३५ मध्ये मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. शालेय जीवनातच त्यांना शिक्षण आणि इंग्रजी भाषेचा विलक्षण ध्यास होता. दर दिवशी इंग्रजी अनुलेखन करण्याची सवय त्यांनी लावून घेतली व त्यातूनच त्यांनी आपले शिक्षणही अत्यंत चिकाटीने पूर्ण केले. रत्नागिरीत व्यवसायाच्या शोधात असताना कीर यांना अनेक बरे-वाईट अनुभव आले व अखेर त्यांना रत्नागिरी जिल्हा स्कूल बोर्डामध्ये बदली कारकून म्हणून जेमतेम चार-सहा महिने काम करण्याची संधी मिळाली. थोड्याच वर्षांत कीर व्यवसायाच्या शोधार्थ– १९३६ साली – मुंबईत आले, पण बऱ्यापैकी नोकरी मिळेपर्यंत दीड-दोन वर्षे वाट पाहिल्यानंतर कीर यांना १९३८ मध्ये मुंबई नगरपालिकेच्या शिक्षणखात्याच्या स्कूल कमिटीत बदली 'अटेंडन्स इन्स्पेक्टर'ची नोकरी मिळाली. पुढे यथावकाश त्यांनी म्युनिसिपल शिक्षण विभागात वेगवेगळ्या विभागांतील पदांवरून जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९४० मध्ये मुंबई नगरपालिकेच्या स्कूल कमिटीत कारकून पदावर कायम झाल्यावर कीर यांचा गुहागरच्या कनगुटकर परिवारातील विमल नामक मुलीशी ३ ऑगस्ट १९४० रोजी विवाह झाला. सलग तेवीस वर्षांच्या इमानेइतबारे केलेल्या सेवेनंतर त्यांनी १९६२ च्या डिसेंबरमध्ये राजीनामा



तत्कालीन संरक्षणमंत्री
यशवंतराव चव्हाण यांच्यासमवेत

रत्नागिरी येथे वीर सावरकर
यांच्यासमवेत



दिला व सर्वस्वी लेखनास वाहून घ्यायचे ठरवले. नगरपालिकेतील नोकरीच्या त्या रुक्ष वातावरणातही कीर यांनी आपले इंगजी लेखन एकीकडे चालूच ठेवले होते हे विशेष. त्या कालावधीत त्यांनी इंग्रजी वाचन व उत्तम वाङ्मयाचे अनुलेखन याचा नित्य परिपाठ चालू ठेवला. त्याचवेळी लाहोरहून प्रसिद्ध होणारा 'संडे टाइम्स', बेझवाड्याचे 'गोष्टी' आणि कालिकतहून प्रसिद्ध होणारे 'हार्बिजर' या तत्कालीन नियतकालिकांमधून त्यांनी 'धनंजय' हे नाव घेऊन इंग्रजी लेखन सुरू केले. नागपूरहून प्रसिद्ध होणाऱ्या पु.भा. भावे यांच्या 'आदेश' साप्ताहिकातूनही कीर यांचे मराठीमधून किरकोळ स्वरूपाचे लेखन चालूच होते. कीर यांची 'पेन पिक्चर्स ऑफ ग्रेट इंडियन्स' ही 'धनंजय' या टोपणनावाने लिहिलेली इंग्रजी (चित्रमय) लेखमाला हिंदुसभेच्या 'फ्री हिंदुस्थान' या साप्ताहिकातून प्रसिद्ध होत असे. मुळगावकर यांची चित्रे आणि कीर यांची शब्दचित्रे त्यात असत. ते पाहून सावरकर यांनी त्यांचे चरित्र इंग्रजीत लिहिण्यास कीर यांना सुचवून पाहिले.


सावरकर यांच्या विचारांचा प्रभाव पूर्वीपासून कीर यांच्यावर होताच; शिवाय रत्नागिरीत पतितपावन मंदिर प्रवेशातून झालेल्या समाजक्रांतीच्या घटनेचे कीर साक्षीदारही होते. चरित्र साहित्यावरील अनेक इंग्रजी ग्रंथांचा अभ्यास, खुद्द चरित्रनायक सावरकर यांचा आधार व त्यांनी उपलब्ध करून दिलेले मूळ दस्तऐवज यांच्या आधारे कीर यांनी कमालीच्या तयारीने सावरकर चरित्र लिहिण्याचा संकल्प सोडला आणि पूर्णही केला. कार्लाइड लिखित 'फ्रेंच रेव्होल्युशन' ग्रंथाचे वाचन, सावरकर यांच्यावरील सर्व वाङ्मयाचे दोन-तीनदा वाचन, वृत्तपत्रातील संदर्भ बारकाईने डोळ्यांखालून घालणे हे सर्व कीर अनेक वर्षे करत होते. इतकेच नव्हे, तर सावरकरांच्या तुरुंगवासाचे वर्णन वाचकांसमोर नीटपणे मांडता यावे म्हणून कीर यांनी 'द टेल ऑफ टू सिटीज' हा चित्रपटही बघितला! या चरित्रग्रंथास २४७ संदर्भ असून, कीर यांनी हा ग्रंथ १९४७ ते १९५० या कालावधीत लिहून काढला. दीड खोल्यांच्या घरातील ८ बाय १०च्या आपल्या स्वयंपाकघरात मांडीवर पाट ठेवून रात्री उशिरापर्यंत कीर यांचे लेखन चाले. यावेळी व पुढील चरित्रलेखनाच्या वेळी कीर यांना त्यांच्या पत्नीचे, सौ. सुधाबाईंचे व परिवाराचे बहुमोल सहकार्य मिळाले. त्या सुमारास, म्हणजे सावरकर चरित्र लिहून पूर्ण झाले तेव्हा, गांधी यांची हत्या होऊन सावरकर अटकेत गेले. पुढे त्यांची निष्कलंक मुक्तता झाल्यावर कीर यांनी स्वतः सावरकर याचे क्रांतिकारी जीवनाचे अनेक पैलू शब्दबद्ध केलेला व सावरकर यांचे सर्वांगीण व समग्र दर्शन घडवणारा 'वीर सावरकर अँड हिज टाइम्स' हा पहिला चरित्रग्रंथ २८ मे १९५० या दिवशी प्रसिद्ध केला. अल्पशिक्षित असूनही चिकित्सक, व्यासंगी व समतोल व्यक्तीच्या त्या अफाट लेखनकर्तृत्वाचा सर्व


> श्री. धनंजय कीर हा महाराष्ट्रातला एक महान चमत्कार आहे. मोठमोठ्या विद्वानांनी आणि 'मी मी' म्हणणाऱ्या लेखकांनी आपला गर्व ज्यांच्या पायी वाहून आपली डोकी घासावीत असे अचाट कार्य कीरांनी केलेले आहे. पाश्चात्य देशांत जर ते जन्माला आले असते तर रुपया-दोन रुपये गोळा करून अशा थैल्या त्यांना देण्याचा हास्यास्पद प्रसंग निर्माण झाला नसता. महापुरुषांप्रमाणे किंवा महापुरुषांइतकेच त्यांचे चरित्राकारही मोठे असावे लागतात. 'येरा गबाळ्याचे ते काम नोहे'. टिळक, सावरकर, आंबेडकर आणि फुले या चार आणि अलीकडे प्रसिद्ध झालेले गांधी चरित्र अशा पाच महापुरुषांच्या कर्तृत्वावर भारताचे यशोमंदिर उभे आहे. अशा भारताच्या आधारस्तंभांची महान चरित्रे लिहिणारे धनंजय कीर हे महाराष्ट्राचे नव्हे तर भारताचे महान सेवक आहेत. त्यांना कितीही मोठी थैली दिली तरी त्यांचे उपकार कसे फिटणार?
>
> – आचार्य प्र. के. अत्रे
>
> दैनिक मराठा, एप्रिल १९६५

स्तरांवर गौरव झाला! ''सावरकरांवरील अनेक पुस्तकांतील एक उत्कृष्ट ग्रंथ'' असे उद्‌गार भारतातील व परदेशांतील संपादक व पुढाऱ्यांनी काढले. परंतु कीर जेव्हा सावरकर चरित्रग्रंथाच्या प्रती घेऊन विक्रेत्याकडे जात तेव्हा तेथे त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला जाई! परंतु 'हिंदू'ने जेव्हा या ग्रंथाचे परीक्षण लिहून कौतुक केले तेव्हा ग्रंथविक्रेते कीर यांच्याकडे स्वतः येऊ लागले!! ''कीर, तुम्ही आता कायद्याच्या कचाट्यात सापडणार!'' अशी भीतीही काही कायदेपंडितांनी कीर यांना दाखवली होती. पुढे, काही काळानंतर लोकमान्य टिळक यांचेही चरित्र कीर यांनी आव्हान पेलून लिहिले.

धनंजय कीर यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रलेखनास (Life & Mission-Ambedkar) 'उद्धरेत अत्मनाम् अत्मनाम्' हे बाबासाहेबांचे ध्येयवाक्य कारण असावे. कीर यांनी आपल्या स्वयंशिस्तीप्रमाणे आंबेडकर चरित्रलेखनास आवश्यक साधने गोळा करण्यास सुरुवात केली आणि हे काम तीन-चार वर्षे चालले. ते ठिकठिकाणी हिंडून केले. परळ, लालबाग येथून प्राप्त झालेली साधने कीर यांनी बारकाईने नजरेखालून घातली आणि अभ्यासली. त्यातील नायगाव येथील वडवळकर यांच्याकडे असलेली अनेक साधने पाहण्यासाठी कीर व त्यांचे बंधू विनायकराव ऑफिस वेळेनंतर नियमितपणे जात असत. तेथील गोणपाटाच्या पिशवीतील कात्रणे काढ, ती क्रमवारी लावून टिपणे बनव असे सर्व व्याप कीर यांनी केले. आंबेडकरांच्या बालपणी सहवासात येऊन गेलेल्या वयस्कांशीही कीर संपर्क साधत होते. डॉ. आंबेडकर लिखित एकूणएक साहित्य कीर यांनी अभ्यासले. शिवाय, आंबेडकर आजारी असताना कीर संधी मिळेल त्याप्रमाणे आपल्या मनातील अनेक शंकांचे निरसन आंबेडकर यांच्याकडून करून घेत होते. चरित्रनायकाच्या समकालीन सहकाऱ्यांशी संपर्क, मूळ दस्तऐवज पाहूनच लेखन ही प्रमुख एकनिष्ठता कीर यांनी या चरित्रलेखनाच्या प्रसंगीही तंतोतंत पाळली. खरे पाहता, याच सुमारास कीर लोकमान्य टिळक यांच्या चरित्रग्रंथाची जुळवाजुळव अगोदरपासून करत होते. तेव्हा, ''१९५४ मध्ये डॉ. आंबेडकर यांची एकसष्टी आहे म्हणून त्यांचा चरित्रग्रंथ १९५४ मध्ये प्रकाशित व्हावा'' असे अ.स. भिडे या कीर यांच्या स्नेह्यांनी कीर यांना सुचवले आणि तसे झालेही. त्यानंतर 'लोकमान्य टिळक : फादर ऑफ अवर फ्रीडम स्ट्रगल' हे टिळक चरित्र १९५६ मध्ये पूर्ण होऊन ते १९५९च्या ऑगस्ट महिन्यात प्रसिद्ध केले गेले. तेव्हा टिळक शतसांवत्सरिक पारितोषिकासाठी कीर यांनी स्वतः लिहिलेले टिळकचरित्र पाठवले होते, पण समितीने त्यांना पारितोषिक नाकारले! परंतु ते चरित्र १९५९ मध्ये प्रत्यक्ष प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या सर्व प्रती संपल्या आणि लगेच दुसरी आवृत्ती काढावी लागली. तसे पहिले तर लोकमान्य टिळक यांचे चरित्र त्यांचे निकटवर्ती न. चिं. केळकर यांनी लिहिलेले होते. परंतु कीर यांनी लिहिलेल्या या चरित्रात टिळक यांच्याविषयी अनेक अविस्मरणीय घटना नमूद केल्या आहेत. टिळक-आगरकर यांचे पत्रव्यवहार, त्यांचे परस्परसंबंध यावर कीर यांच्या ग्रंथात प्रकाश टाकलेला आढळतो.

''महात्मा जोतिराव फुले यांनीच मला कार्यास प्रवृत्त केले असल्याने ते माझ्या गुरुस्थानी आहेत, पण प्रकृती साथ देत नसल्याने त्यांचे चरित्र इच्छा असूनही मी लिहू शकत नाही'' अशी खंत डॉ. आंबेडकरांनी एक दिवस कीर यांच्याकडे व्यक्त केली. त्याच वेळी कीर यांनी महात्मा फुले यांचे चरित्र, (Mahatma Jotirao Phule-Father of Indian Social Revolution) लिहिण्याचे ठरवले. कीर यांचा ५१ वा वाढदिवस २८ एप्रिल १९६३ रोजी तत्कालीन संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला तेव्हा कीर यांनी 'महात्मा फुले' यांचे चरित्र पूर्ण करण्याचे वचन दिले. जोतिराव फुले यांचा जन्म एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झालेला असल्याने त्यांच्याविषयीच्या चरित्रसाधनांची उपलब्धता हे मोठे आव्हानच होते, किंबहुना ती अत्यंत अवघड गोष्ट होती. अशा स्थितीत फुले यांचे साधार व वस्तुनिष्ठ चरित्र लिहिणे हेसुद्धा मोठे आव्हानच होते. परंतु फुले यांची थोरवी महाराष्ट्राच्याही पलीकडे जगाला ज्ञात व्हावी या दृष्टीने कीर यांनी ते स्वीकारले. आचार्य अत्रे, भाई बागल, प्रबोधनकार ठाकरे




इत्यादींनी कीर यांना १९५९ मध्ये चरित्रसाधने उपलब्ध करून दिली. शिवाय महात्मा फुले यांच्याविषयी माहिती, आठवणी ज्यांच्यापाशी मिळू शकतील अशा व्यक्तींना भेटण्यासाठी कीर अक्षरशः वणवण फिरत होते. सरकारी दप्तरे, टाइम्स ऑफ इंडिया, हिंदुस्तान टाइम्स. द बॉम्बे गार्डियनसह अनेक (जवळजवळ १७) इंग्रजी, मराठी व हिंदी नियतकालिकांचे अत्यंत बारकाईने वाचन करण्यात कीर यांनी ८ ते ९ महिने खर्च केले. हे करत असताना सर्व मिळून पंचवीस हजार पानांचे वाचन झाले! फुले चरित्राची मांडणी करत असताना आपल्यावर नोकरीचे बंधन येत आहे अशी कीर यांना जाणीव होताच सेवेची आठ वर्षे शिल्लक असताना कीर यांनी नोकरीचा सरळ राजीनामाच दिला! कीर यांना फुले यांच्या चरित्रलेखनाने किती झपाटून टाकले होते याची येथे कल्पना येते. १९६३च्या अखेरपर्यंत कीर यांचे टिपणे घेण्याचे काम सतत चार वर्षे चालू होते. स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर जवळजवळ वर्षभराने, १९६४च्या सुरुवातीला त्यांनी फुले यांचे चरित्र लिहायला घेतले आणि सत्तावीस दिवसांत ते पूर्णही केले. 'महात्मा जोतिराव फुले : फादर ऑफ अवर सोशल रेव्होल्युशन' हा चरित्रग्रंथ यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १८ आक्टोबर १९६४ रोजी प्रसिद्ध केला गेला. त्याप्रसंगी ग्रंथ प्रकाशन समितीच्या अध्यक्षपदावर ना. बाळासाहेब देसाई होते.



शिवाजी विद्यापीठाकडून 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी प्रदान–
धनंजय कीर, सोबत कुलगुरू प्रा. कणबरकर

प्रख्यात साहित्यिक जयवंत दळवी यांनी एके ठिकाणी कीर यांचे वर्णन 'अधू डोळे पण तीक्ष्ण दृष्टी' असे केले आहे. जास्त वेळ वाचन केल्यानंतर कीर यांना त्रास होणे ठरलेले असे. अहोरात्र लेखन केल्याने दृष्टी अधिक बिघडत गेली. कीर यांचे स्नेही वि.द घाटे कीर यांच्या उणे १३ नंबरच्या चष्म्याला 'इंदुरी कंदील' म्हणत. हृदयविकार, रक्तदाब आदी व्याधीही अधूनमधून उपस्थिती दाखवत होत्या. ''एखाद्या अखंड किल्ली दिलेल्या घडाळ्याप्रमाणे कीर यांचे वाचन, चिंतन आणि लेखन सुरू असते'' असे वि.स खांडेकर यांनी म्हटले होते. आईच्या बाजूने चिकाटी आणि धाडस, आणि वडिलांच्या बाजूने अलिप्त व निरपेक्ष अशी साधुवृत्ती; असा संगम धनंजय कीर यांच्यात झालेला आढळत असे.

पुढे, सामाजिकक्रांती व सुधारणा यांची विचारधारा मांडणारे राजर्षी शाहू महाराज यांचेही चरित्र कीर यांनी लिहिले. वादळी समाज आणि वादग्रस्त चरित्रनायक यांचे 'आमूलम् लिख्यते' धारणेने केलेले वस्तुनिष्ठ आणि अभिनिवेशरहित चित्रण या चरित्रात आढळते. महात्मा गांधींचे कीर यांनी लिहिलेले चरित्र केवळ चरित्र नसून गांधीयुगाचा इतिहास म्हणावा लागेल. ''गांधीजींच्या गुणदोषांचा अलिप्ततेने व निर्भयतेने विचार अन्य कोणत्याही ग्रंथातून झालेला नाही, गांधींना ते जसे होते तसे जगासमोर कीर यांनी ठेवले आहे. गांधीजीं–विषयीची अंध भक्ती किंवा कुत्सित बुद्धीही त्यात नाही'' असे भाई माधवराव बगल यांनी कीर यांच्या गौरवग्रंथात म्हटले आहे. गांधी सामान्यातून असामान्य कसे झाले, गांधीजी यांनी संयम, सात्त्विकता, मानवतावाद यांचा आदर्श जगापुढे कसा ठेवला याचे दर्शन कीर यांनी लिहिलेल्या 'पोलिटिकल सेन्ट अँड अन आर्मड् प्रोफेट' या मार्च १९७३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या गांधीचरित्रात घडते.

वरील सर्व चरित्रग्रंथ मूळ इंग्रजीत होते. धनंजय कीर यांनी मुळात इंग्रजीतून लिहिलेली सावरकर, आंबेडकर, राजर्षी शाहू छत्रपती, जोतिबा फुले, लोकमान्य टिळक, म.गांधी या सहा महानायकांची चरित्रे एकोणिसाव्या शतकाचा मध्यकाल ते विसाव्या शतकाचा मध्यकाल या कालखंडाचा इतिहासच म्हणावी लागतील. या जवळपास सर्व चरित्रांची मराठी, गुजराती, बंगाली, तमिळ आणि तेलुगु भाषांत भाषांतरे झालेली असून ती लोकप्रियही झालेली आहेत. विशेष म्हणजे डॉ. आंबेडकर, राजर्षी शाहू छत्रपती,

म. गांधी यांची कीर यांनी लिहिलेली चरित्रे धर्मग्रंथाइतकी महत्त्वाची मानली गेली आहेत. १९७० मध्ये श्री नामदेवचरित्र-लेखनसमितीचे सभासद असताना कीर यांनी 'श्री नामदेव : चरित्र, काव्य आणि कार्य' या ग्रंथाचे सहलेखन केले. त्यावेळी श्री नामदेव सप्तशताब्दी उत्सव समितीचे ते अध्यक्षही होते. १९६६ ते १९७३ या कालावधीत कीर यांनी चरित्रग्रंथांशिवाय इतर अनेक ग्रंथ लिहून पूर्ण केले. २३ एप्रिल १९७३ रोजी धनंजय कीर यांना एकसष्टावे वर्ष लागले. त्याप्रसंगी त्यांचे स्नेही व चाहते यांनी कीर यांच्या वाङ्मयसेवेचा सन्मान करून 'धनंजय कीर : व्यक्ती आणि चरित्रकार' हा गं. दे. खानोलकर संपादित ग्रंथ त्यांना अर्पण केला. त्यात संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण तसेच वि.स.खांडेकर, पु.ल देशपांडे, आचार्य अत्रे, विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, वि.द. घाटे, निसीम इझेकील अशा अनेक लेखक आणि विचारवंतांनी कीर यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे.

धनंजय कीर यांनी लिहिलेल्या चरित्रात चारित्रनायकाचा व्यक्तिविकास, सत्यनिष्ठ व्यक्तिदर्शन व काळाचे हुबेहूब दर्शन घडत गेल्यामुळे ही चरित्रे भारतात आणि परदेशात लोकप्रिय झाली. परदेशातील अनेक प्रकाशकांनी ती निरनिराळ्या भाषांमधून प्रकाशितही केली आहेत. धनंजय कीर यांच्या कार्याचा गौरव भारत सरकारतर्फे १९७१ मध्ये पद्मभूषण किताब देऊन केला गेला. नव नालंदा महाविहार विद्यापीठाने १९७० साली 'विद्यावारिधि' ही सन्मान्य पदवी देऊन त्यांचा गौरव केला. तसेच शिवाजी विद्यापीठाने १९८० मध्ये त्यांना 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी बहाल करून सन्मान केला होता.

**- डॉ. श्रीकांत परळकर**
५१-अ, गोखले रोड (उत्तर)
दादर, मुंबई
भ्रमणध्वनी ९८६९०८६६१८





**माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
**नारायण विष्णू आठवले**

**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**

दुसरे महायुद्ध ऐन रंगात आलेले असतानाच महात्मा गांधींनी 'चले जाव' चळवळ सुरू करून 'करेंगे या मरेंगे' हा आदेश दिला. स्वातंत्र्यलढ्याच्या वातावरणाने भारलेल्या काही तरुणांनी सत्याग्रह करून तुरुंगात जाण्याऐवजी सरकारी नोकरीत राहून ब्रिटिशांच्या युद्धकार्यक्रमात अडथळे आणण्याचा आणि घातपाती कृत्ये करण्याचा मार्ग पसंत केला. दारूगोळा पुरवठ्यात अनेक प्रकारचे घोटाळे घडवून दिल्यानंतर त्यांनी ११ नोव्हेंबर १९४२ रोजी देहूरोड डेपोमध्ये स्फोट घडवून आणला. 'देहूरोड बॉम्बस्फोट कट' म्हणून गाजलेल्या या प्रकरणात सहभागी असणारे प्रमुख आरोपी नारायण विष्णू आठवले यांनी सांगितलेल्या या कटाची पार्श्वभूमी, घातपाती कृत्ये, अटक, न्यायालयीन पातळीवरील संघर्ष आणि वेगवेगळ्या तुरुंगांतील बंदिवास यांची आणि जीवनाची साद्यंत कहाणी...

**नगरमंथन**
**प्रकाश पेठे**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

नुसते रुंद रस्ते आखून दुतर्फा वस्ती केली की नगर होत नाही. त्यात वडापिंपळाचे पार, तलाव, व्यायामशाळा, चबुतरे, घड्याळांचे टॉवर्स, विशाल क्रीडांगणे, हरितपट्टे, लहानमोठे बगीचे, घनदाट वृक्षांचे भूखंड अशी नानाप्रकारची लोकोपयोगी ओळखस्थाने निर्माण करावी लागतात; तेव्हा कुठे नगराला आकार येऊ लागतो. प्रत्येक नगराचा रागविस्तार करावा लागतो. मींड, हरकती, मुरक्या, तिहाया, ताना-तराणे घेत गाणे बजावणे रंगवावे लागते तर ते नगर होते. नाहीतर नुसती वस्ती वाढत जाते. तेच आज आपल्या अनेक महानगरांत दिसते.

# ‘मनाचे कवडसे’मधून मानवी मनाचा शोध

**प्रतिनिधी**

‘मनाचे कवडसे’ हे पुस्तक एक चिंतनिका असून त्यातून मानवी मनाचा शोध घेण्यात आला आहे, असे विचार महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी व्यक्त केले.

२४ मार्च रोजी, हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये, ‘ग्रंथाली’ प्रकाशित व विश्वास काकडे लिखित ‘मनाचे कवडसे’ या पुस्तकाचे प्रकाशन सावंत यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. शिरीषा साठे, उद्योजक शरद ठाकरे, अरुणा बुरटे, डॉ. प्रमोद सलगरकर, चंद्रिका चौहान, अलका काकडे आदी उपस्थित होते.


यावेळी सावंत म्हणाले, ‘‘सुसंगती आणि जीवनाची अर्थपूर्णता हे पछाडणारे प्रश्न लेखकाला नेहमीच पडत आले आहेत. जीवनाकडे बघण्याची दृष्टी कशी असावी, तसेच देह आणि आत्मा या दोन भिन्न गोष्टी आहेत हे सांगून त्यांनी विविध विषयांचा आढावा या पुस्तकातून घेतला आहे.’’

डॉ. प्रमोद सलगरकर मनोगतात म्हणाले, ‘‘कालच्या पेक्षा आज जीवन कळले तो खरा आनंद आहे. वैयक्तिक जीवनाच्या पलिकडे जग आहे त्याचा विचार करावा. ‘मनाचे कवडसे’ पुस्तकाने साहित्यात मोलाची भर घातली आहे.’’ शरद ठाकरे म्हणाले, ‘‘लेखक विश्वास काकडे यांना सतत नाविन्याचा ध्यास आहे. यश, सुख, आनंद यांचा संबंध या पुस्तकातून मांडला आहे. एक वेगळा विचार करण्याची दिशा या लिखाणामुळे मिळते.’’

‘‘आपण राजकारणातील लोकशाही तर स्वीकारली; परंतु आपल्याला ती लोकशाही दैनंदिन जीवनात मात्र आणता आली नाही.’’ अशी खंत पुणे येथील समुपदेशक डॉ. शिरीषा साठे यांनी व्यक्त केली.

त्या पुढे म्हणाल्या, ‘‘कोणताही नियम मोडल्यानंतर मिळणाऱ्या शिक्षेच्या स्वरूपावरून आपण तो पाळायचा की नाही हे ठरवतो. चौकात वाहतूक पोलिस नसतील तर हमखास तोडला जाणारा ‘सिग्नल’ हे त्याचेच प्रतीक आहे.’’ अनेक विचारवंतांचे विचार एकत्रितपणे वाचण्याची, समजून घेण्याची संधी ‘मनाचे कवडसे’ या पुस्तकामुळे वाचकांना प्राप्त झाली आहे, असेही डॉ. साठे यांनी सांगितले.

यावेळी अरुणा बुरटे, चंद्रिका चौहान यांनी आपले विचार व्यक्त केले. जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण गेडाम यांचा संदेश सराफ यांनी वाचून दाखवला. प्रास्ताविक अलका काकडे यांनी केले तर सूत्रसंचालन आकाशवाणीचे निवेदक अभिराम सराफ यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. निशिकांत ठकार, डॉ. उमाकांत वरेरकर, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. जयंत शेळगीकर, विरोधी पक्षनेत्या रोहिणी तडवळकर, डॉ. नभा काकडे, डॉ. प्रदीप नांदगांवकर, रोहित जेऊरकर, डॉ. सतीश वळसंगकर यांच्यासह श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.

## मनाचे कवडसे – विश्वास काकडे

आतापर्यंतचा मानवी इतिहास तपासून पाहिला तर असे आढळते की सामाजिक वास्तव हे गुंतागुंतीचे होत चालले आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आयुष्यावर नियंत्रण हवे आहे. परंतु या नियंत्रणाची फक्त इच्छा, मानसिक बळ व प्रेरणा असून उपयोगी नाही. मानवी वर्तन, यश, सुख, शांती हे सर्व आता सोपे राहिले नाही.

प्रत्येक व्यक्ती ही स्वतःच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे वागत असते. एका अर्थाने प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या आयुष्यात काही तत्त्वज्ञान स्वीकारते. आतापर्यंत बऱ्याच तत्त्ववेत्त्यांनी आपापले तत्त्वज्ञान मांडले. परंतु कोणतेही तत्त्वज्ञान मनुष्याचा साकल्याने विचार करीत नाही. यासाठीच आयुष्यातले महत्त्वाचे घटक, व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध, मूल्ये, भौतिक सुखे- हे सर्व तपासून घेऊनच स्वीकारायला हवेत. हाच प्रयत्न या ग्रंथात केला आहे. हा अनेक दृष्टिकोनांपैकी एक दृष्टिकोन आहे.



# उल्लेखनीय विदर्भाच्या वाट्याला ‘अनुल्लेखा’चे दु:ख!

**प्रा. अजय देशपांडे**


उल्लेखनीय कार्य करणारी अनेक माणसे सदासर्वदा सर्वत्र असतात, पण त्यांचे कार्य महत्त्वाचे असतानाही दुर्दैवाने अनुल्लेखितच राहते. लेखक, कवी, चित्रकार, संगीतकार, प्रकाशक, संपादक, समाजसेवी ही आणि इतर अनेक क्षेत्रांत जीव ओतून काम करणारी काही माणसे या ना त्या कारणाने अलक्षित राहतात. त्यांचे लेखन, त्यांच्या कलाकृती, त्यांची संपादने, त्यांचे समाजकार्य काळाच्या कसोटीवर टिकणारे असते. पण का कुणास ठाऊक, काळच त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो! अशी अनुल्लेखित असलेली माणसे सर्वच प्रांतात असतात, तशी विदर्भातही आहेत. प्रसिद्धीच्या प्रकाशाची तिरीप ज्यांच्या कार्यापर्यंत पोचली नाही, अशा माणसांच्या कार्याचा, कलाकृतींचा वेध येथे घेतला आहे.

विदर्भातील बाळकृष्ण दाभाडे यांचे ‘अक्षरशोध’ हे पुस्तक १ जुलै १९७३ रोजी प्रकाशित झाले. भारतीय शिल्प आणि भारतीय चित्रे या विषयांवरील चौदा निबंध या पुस्तकात आहेत. महत्त्वाचे म्हणजे या पुस्तकात ‘सुधालेपविधानम्’ या प्राचीन भारतीय भित्तिचित्रांविषयीच्या संस्कृत रचनेचे मराठी रूपांतरण सार्थ व सटीप दिले आहे. ‘सुधालेपविधानम्’ या संस्कृत रचनेत, भित्तिचित्रे काढण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तयारीसह त्याच्या तंत्राची सामान्य रूपरेखा दिली आहे. अजिंठा, बाघ, बदामी, सिगिरिया, सित्तन्नवासल, वेरूळ वगैरे ठिकाणी असलेल्या प्राचीन भित्तिचित्रांच्या निर्मितीतंत्राची माहिती या संस्कृत रचनेत आहे. बालकृष्ण दाभाडे यांनी या संस्कृत रचनेचे मराठी रूपांतर प्रथमच ‘अक्षरशोध’मध्ये दिलेले आहे. चित्रकला, शिल्पकला आणि साहित्य यांच्यातील अनुबंधांचा शोध घेणारे हे पुस्तक चित्र-शिल्प-साहित्याच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त आहे. अगदी संदर्भग्रंथाचे उपयोगिता मूल्य असणाऱ्या या ग्रंथाची प्रत काही ग्रंथालयांचा अपवाद वगळला तर आज दिसतही नाही. अभ्यासपूर्ण संशोधन, लेखन असणाऱ्या या पुस्तकावर एकप्रकारे अन्यायच झालेला आहे. विदर्भातले हे पुस्तक महाराष्ट्राला आणि खुद्द विदर्भालाही माहीत असण्याची शक्यता कमीच आहे.

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफीसाठी ऑक्स्फर्ड विद्यापीठात सादर केलेला ‘द ओरिजिन ॲण्ड डेव्हलपमेंट ऑफ रिलिजन इन वैदिक लिटरेचर’ हा शोधप्रबंध १९३३मध्ये ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने ग्रंथरूपात प्रकाशित केला. त्यानंतर अमरावती विद्यापीठाने २००४ मध्ये या ग्रंथाचा डॉ. आनंद पाटील यांनी केलेला मराठी अनुवाद प्रकाशित केला. ‘धर्माचा वैदिक वाङ्मयातील उदय आणि विकास’ असे या ग्रंथाचे नाव आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचा शोधप्रबंध मराठीत ७० वर्षांनंतर का होईना प्रकाशित झाला. अभ्यासकांना तो उपलब्ध झाला. या सर्व बाबी समजून घेतल्या तरी या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथाचे महाराष्ट्रात जसे व्हायला हवे तसे स्वागत झालेच नाही; कदाचित या ग्रंथाच्या प्रती मोठ्या संख्येने खपल्या असतीलही. पण अमरावती विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या एका महत्त्वाच्या ग्रंथाविषयी महाराष्ट्रातील बुद्धिवंतांमध्ये जी चर्चाचिकित्सा व्हायला हवी होती, ती मात्र झालीच नाही. विद्वानांचे मौन देखील अनेकदा अन्यायकारक असते. हा ग्रंथ महाराष्ट्रातल्या सर्व वरिष्ठ महाविद्यालयांतल्या ग्रंथालयांत आहे का? राज्यातल्या ‘अ’, ‘ब’ श्रेणीच्या ग्रंथालयांत आणि शासकीय ग्रंथालयांत आहे का? विद्यार्थ्यांपासून नव्या संशोधकांपर्यंत सर्वांना हा ग्रंथ सहज उपलब्ध होऊ शकतो का? या सर्वच प्रश्नांची उत्तरे जर ‘नाही’ अशी असतील तर महाराष्ट्राने या महत्त्वाच्या ग्रंथाबाबत अनास्था दाखवली आहे, हे कबूल करायला आणि चूक सुधारायला हरकत नाही.

विदर्भातल्या कितीतरी कर्तृत्ववान माणसांचा विदर्भासह महाराष्ट्रालाही विसर पडलेला आहे. विद्वत्रत्न के.ल. दफ्तरी, दादासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, किसन फागू बंदसोडे, महामहोपाध्याय वा.वि. मिराशी, संशोधक हि.ल. कोसारे, तत्त्वचिंतक प्रा. दि.मा. खैरकर, डॉ. य.खु. देशपांडे, डॉ. वा.ना. देशपांडे, गो.रा. दोडके, शंकरराव सुरडकर ही आणि अशी कितीतरी कर्तृत्ववान माणसे आणि त्यांचे कार्य केवळ विदर्भाच्या आणि महाराष्ट्राच्या अनास्थेमुळे विस्मरणात गेले आहे.

कथा, कादंबऱ्या, एकांकिका, चरित्र, निबंध लिहिणारे ना.रा. शेंडे हे विदर्भातील अत्यंत महत्त्वाचे साहित्यिक होते. त्यांचे ‘लोकसाहित्यसंपदा’ हे पुस्तक, ‘दलितांचे जग : वेदना आणि शिष्टाई’ हा





वैचारिक लेखांचा संग्रह या पुस्तकांचे खरे तर पुनर्मुद्रण करावयास हवे.

कवी, कादंबरीकार आणि 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' या ग्रंथाद्वारे मराठी साहित्यशास्त्र व समीक्षाशास्त्राला समाजशास्त्रीय अंगाने विचार करायला लावणारे समीक्षक शरच्चंद्र मुक्तिबोध यांची 'काही निबंध' (१९६३, नागपूर प्रकाशन, नागपूर) व 'जीवन आणि साहित्य' (१९७२, अभिनव प्रकाशन, मुंबई) ही दोन पुस्तके जवळजवळ विस्मृतीत गेली आहेत. ही पुस्तके देखील पुनर्मुद्रित करण्याची गरज आहे.

पद्मविभूषण डॉ. माधव श्रीहरी उपाख्य बापूजी अणे यांच्या वाङ्मयीन व वैचारिक लेखनाच्या बाबतीतही आता नव्याने पुनर्मुद्रणासाठी प्रयत्न करायला हवेत. प्राचार्य राम शेवाळकर यांनी 'अक्षरमाधव' (पद्मविभूषण डॉ. माधव श्रीहरी उपाख्य बापूजी अणे यांच्या निवडक वाङ्मयीन व वैचारिक लेखांचा संग्रह, खंड १ व २.) या ग्रंथाचे संपादन केले. त्यातील पहिल्या खंडाला ग.त्र्यं. माडखोलकर यांची तर दुसऱ्या खंडाला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रस्तावना आहे. हे दोन्ही खंड पुनर्मुद्रित करण्याची व महाराष्ट्रासह अन्य जेथे जेथे मराठी भाषक आहेत तेथे पोचवण्याची गरज आहे.


विदर्भातील व्रतस्थ संशोधक, समीक्षक प्रा. म.शं. वाबगावकर यांची तीन पुस्तके प्रकाशित आहेत. 'संशोधन व चिंतन', 'संशोधन व समीक्षा' आणि 'संशोधन व आस्वादन' (तीनही पुस्तकांचे प्रकाशक साहित्य प्रसार केंद्र, नागपूर) याशिवाय सुमारे शंभर प्रकाशित लेख आहेत. प्रा. वाबगावकर यांनी विविध वृत्तपत्रे व नियतकालिकांतून लिहिलेल्या या लेखांचे संकलन-संपादन करून काही पुस्तके तयार होऊ शकतात. आजच्या विदर्भाला आणि महाराष्ट्राला प्रा. म.शं. वाबगावकर यांचे लेखन माहिती असण्याची शक्यता कमीच आहे.




विदर्भातील डॉ. द.ह. उपाख्य बापूसाहेब अग्निहोत्री यांचे 'मराठी वर्णोच्चार विकास' आणि 'महाराष्ट्र संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान' हे दोन्ही महत्त्वाचे ग्रंथ आज दुर्मिळ आहेत. डॉ. अग्निहोत्री यांच्या कार्याचे महाराष्ट्राला विस्मरण झाले आहे. त्यांचे हे दोन्ही ग्रंथ पुनर्मुद्रित करण्याचा विचार महाराष्ट्राच्या मनात कधी येणार? डॉ. या.मा. काळे यांनी लिहिलेला 'प्राचीन विदर्भाचा इतिहास' हा ग्रंथ आज पाहायलाही मिळत नाही. कादंबरीकार गीता साने हे नावदेखील असेच विस्मृतीत गेले आहे. 'भारतीय स्त्री जीवन' हा त्यांचा ग्रंथ १९८६ मध्ये मौज प्रकाशन गृहाने प्रकाशित केला. भारतीय स्त्री प्रश्नाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असणाऱ्या या महत्त्वाच्या ग्रंथाकडे महाराष्ट्राने फारसे लक्ष दिले नाही, हे कबूलच करावे लागते. कादंबरीकार शरच्चंद्र टोंगो यांच्या कादंबऱ्यांचाही विसर पडला आहे. प्रा. जयंत परांजपे यांची 'श्री.ना. पेंडसे हस्तलिखित आणि परिष्करणे' (अमेय प्रकाशन, नागपूर, १९८३) या अत्यंत महत्त्वाच्या पुस्तकाचे पुनर्मुद्रण व्हायला हवे.

डॉ. सु.श्री. पांढरीपांडे यांनी केलेले गांधीवादाच्या संदर्भातील चिकित्सात्मक लेखन, पराग चोळकरांनी केलेले संकलन, संपादन आणि लेखन हे सारे महाराष्ट्र जाणीवपूर्वक विसरून जाणार आहे का?

अमरावती येथील प्रा. माणिक कानेड हे ज्येष्ठ नाट्यसमीक्षक. ते अत्यंत गंभीरपणे आणि अभ्यासूवृत्तीने जागतिक रंगभूमी-विषयक लेखन करत आहेत. २००७ मध्ये रोहन प्रकाशनने 'जागतिक रंभगूमी : पूर्वरंग' व 'जागतिक रंगभूमी : पश्चिमरंग' हा त्यांचा द्विखंडात्मक ग्रंथ प्रकाशित केला. जागतिक रंगभूमीची सर्वांगीण माहिती देणाऱ्या या द्विखंडात्मक ग्रंथाचे महत्त्व ओळखून विदर्भासह महाराष्ट्राने त्याचे स्वागत करायला



हवे होते, पण तसे झाले नाही. उण्यापुऱ्या सहा वर्षांतच हा ग्रंथ विस्मृतीत गेला.

नागपूर येथील ज्येष्ठ नाट्यसमीक्षक प्रा. म.ना. लोही यांनी विदर्भातील नाटक आणि रंगभूमीविषयक भरपूर लेखन केले आहे. लाखे प्रकाशनने प्रा. म.ना. लोही यांचे 'मराठी नाटक आणि रंगभूमी : एक अभ्यास' हे पुस्तक २००६ मध्ये प्रकाशित केले, पण हे पुस्तकही अल्पावधीतच विस्मृतीत गेले.

कवी आणि समीक्षक डॉ. शरद कळणावत यांनी 'मराठी वाङ्मयाचा वाचक आणि त्याची वाङ्मयीन अभिरुची' या विषयावर १९८६ मध्ये अमरावती विद्यापीठात पीएच.डी.चा प्रबंध सादर केला. अमरावती विद्यापीठातला हा पहिलाच प्रबंध २००६ मध्ये ग्रंथरूपाने प्रकाशित झाला. एका वेगळ्या आणि महत्त्वाच्या विषयावरील संशोधन असूनही त्या ग्रंथाकडे महाराष्ट्राचे लक्ष गेलेच नाही.

विदर्भातले ज्येष्ठ कवी तुळशीराम काजे यांचे तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'नभ अंकुरले' हा पहिला कवितासंग्रह १९५८ मध्ये अमरावतीच्या धारा प्रकाशनाने प्रकाशित केला. त्यानंतर १९८३ मध्ये मौज प्रकाशनाने 'भ्रमिष्टाचे शोकगीत' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. २००७ मध्ये अमरावतीच्या काजे प्रकाशनने त्यांचा 'काहूरभैरवी' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. प्रा. तुळशीराम काजे यांच्या 'भ्रमिष्टाचे शोकगीत' या कवितासंग्रहाचे महाराष्ट्रात स्वागतही झाले. तरी समकालीन वाङ्मयीन पर्यावरणात आशय आणि शैलीदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या काजे यांच्या कवितेकडे मराठी समीक्षेने फारसे लक्ष दिलेच नाही. 'काहूरभैरवी' हा उल्लेखनीय असणारा कवितासंग्रह जरा उपेक्षितच राहिला. खरे तर 'कवी तुळशीराम काजे यांची कविता' असा एकच कवितासंग्रह त्यांच्या सर्व कवितांचा समावेश करून विवेचक प्रस्तावनेसह प्रकाशित करण्याची गरज आहे.

शिवा राऊत हे विदर्भातील आणखी एक महत्त्वाचे कवी. १९९३ मध्ये त्यांचा 'अक्षरउत्सव' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. शिवा राऊतांच्या अकाली निधनानंतर विदर्भ साहित्य संघाने 'सांजदिव्यांचे हंबर' हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह प्रकाशित केला. डॉ. आशा सावदेकर, वामन तेलंग यांचे संकलन व संपादन असलेला हा कवितासंग्रह २००० मध्ये प्रकाशित झाला. शब्दकळा, आशय, शैली या साऱ्या दृष्टीने शिवा राऊतांची कविता वेगळी आणि महत्त्वाची आहे; पण ही कविता साऱ्या महाराष्ट्रभर पोचलीच नाही. पृथगात्म जाणिवेची शिवा राऊतांची कविता विदर्भातच खितपत राहिली.

अलीकडची काही पुस्तके महत्त्वाची असूनही ती महाराष्ट्रभर एक तर पोचली नाहीत किंवा त्या पुस्तकांकडे लक्षच दिले गेले नाही. 'आधुनिक मराठी कवितेतील सांगीतिक प्रतिमा' हा डॉ. जयश्री शास्त्री यांचा ग्रंथ २०१० मध्ये नागपूरच्या विसा बुक्सने प्रकाशित केला. १८८५ ते २००४ या प्रदीर्घ कालखंडातील मराठी कवींच्या कवितांतील सांगीतिक प्रतिमांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे. सौंदर्यशास्त्र, साहित्यशास्त्र व संगीतशास्त्र या तीनही ज्ञानशाखांचा संगम असलेला हा ग्रंथ साहित्य आणि संगीत यांच्यातील अनुबंधांचा साधार शोध घेणारा आहे. मराठी साहित्य व समीक्षा व्यवहाराने खरे तर या ग्रंथाचे स्वागत करायला हवे होते. या ग्रंथाकडे जरा दुर्लक्षच झाले.

'मराठीचे आधुनिकीकरण' हा डॉ. विलास चिंतामण देशपांडे यांचा ग्रंथही असाच अलक्षित राहिला आहे. 'मराठी वृत्तपत्रांचे मराठी भाषेच्या आधुनिकीकरणास योगदान' या विषयावरील शोधप्रबंध म्हणजे हा ग्रंथ होय. वेगळ्या आणि महत्त्वाच्या विषयावरचा हा ग्रंथ नागपूरच्या विसा बुक्सने २०१२ मध्ये प्रकाशित केला. मात्र वर्षभरात या ग्रंथाकडे महाराष्ट्राचे लक्ष का गेले नाही, हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

अलीकडच्या काळात प्राचीन साहित्याचे संशोधन करण्यासाठी नवी पिढी समोर येत नाही, असे म्हटले जात असतानाच विदर्भातील डॉ. राजेंद्र गणेश डोळके यांनी मराठीत विदग्ध काव्यरचनेचा पाया घालणाऱ्या नरीन्द्र आणि भास्करभट्ट बोरीकर यांच्या महाकाव्यांची तौलनिक चिकित्सा करणारा ४२१ पानांचा ग्रंथ लिहिला आहे. नागपूरच्या लाखे प्रकाशनाने २०११मध्ये प्रकाशित केलेल्या या ग्रंथास संशोधनमूल्य आणि समीक्षामूल्य असूनही विदर्भासह महाराष्ट्राने या ग्रंथाकडेही काणाडोळाच केल्याचे दिसते.

डॉ. हेमंत खडके यांचा 'अर्वाचीन कवींचा काव्यविचार' हा ग्रंथ पद्मगंधा प्रकाशनने २०१२ मध्ये प्रकाशित केला. अर्वाचीन कवींचा काव्यविचार ग्रंथरूपाने बहुधा प्रथमच प्रकाशित झाला आहे. पण आधुनिक काव्यविचार विशद करणाऱ्या या ग्रंथाबाबत मराठीचे समीक्षाविश्व अकारण नाक मुरडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

साहित्यिकांच्या, अभ्यासकांच्या बाबतीत लक्ष न देण्याचा प्रकार कलावंत आणि काही प्रमाणात समाजसेवकांच्याही संदर्भात झाल्याचे दिसते.

विदर्भात चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगाव येथे श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय आहे. चित्रकार व कलावंत सदानंद बोरकर हे तेथे प्राचार्य आहेत. सभोवती जंगल असलेल्या या गावात सदानंद बोरकर यांनी चित्र, शिल्प व नाट्याचे नंदनवन फुलवले आहे. पण महाराष्ट्रात चित्रकार सदानंद बोरकर यांची रेखाटने किती लोकांना नाहीत आहेत? कलावंत असणाऱ्या बोरकरांच्या स्त्रीअभिनयाला महाराष्ट्राने कधी दाद दिली आहे का? विनाअनुदान तत्त्वावर चालणाऱ्या बोरकरांच्या चित्रकला महाविद्यालयातून कितीतरी नवे चित्रकार तयार होत आहेत. हे चित्रकार त्यांच्या कुंचल्यांतून नवे जग साकार करत आहेत, पण या उपेक्षित-अलक्षित कुंचल्यांचे आविष्कार कुणालाच का दिसत नाहीत? हे आविष्कार 'फेसबुक'वर डोळे लावून बसलेल्या महाराष्ट्राला देखील दिसत नाहीत. घनदाट अरण्यात साकार झालेले

सदानंद बोरकर यांचे चित्र, शिल्प आणि नाटकाचे सृजनशील विश्व उपेक्षेच्या अंधारात का खितपत राहावे? सदानंद बोरकरांच्या रेखाटनांना तरी महाराष्ट्र न्याय देणार का?

नागपूर येथील छायाचित्रकार शेखर सोनी यांनी महाराष्ट्र-छत्तीसगड सीमारेषेवरच्या नक्षलग्रस्त भागातील मानवी जगण्याच्या संघर्षापासून कुंभमेळ्यातील गर्दीपर्यंत अन् शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपासून वाघांच्या मृत्यूंच्या वास्तवापर्यंत कितीतरी घटना, घडामोडी आपल्या कॅमेऱ्याच्या सृजनशील भिंगातून टिपल्या आहेत. शेखर सोनींची छायाचित्रे म्हणजे विचार, भावना आणि सौंदर्य यांची प्रतीती देणाऱ्या साहित्यकृतीच आहेत. पण शेखर सोनी नावाचे छायाचित्रकार महाराष्ट्राला माहीतच नाहीत!

विदर्भातील माणसांनी आयुष्यभर पदरमोड करून नियतकालिके चालवली, प्रकाशनसंस्था चालवल्या, गुणवत्ता-दर्जा सारे काही प्राणपणाने जोपासले, पण त्यांची फारशी दखल विदर्भही घेत नाही आणि उर्वरित महाराष्ट्रही घेत नाही. कवी सुखदेव ढाणके गेल्या सात वर्षांपासून अमरावती येथून 'सर्वधारा' हे वाङ्मयीन नियतकालिक नियमित प्रकाशित करतात. सेवानिवृत्तीनंतर पदरमोड करून डॉ. ढाणके हे नियतकालिक चालवत आहेत. साहित्याच्या दर्जा व गुणवत्तेबाबत अत्यंत चोखंदळ असलेले हे नियतकालिक कुठल्याही तडजोडी स्वीकारत नाही. महाराष्ट्रभर हे नियतकालिक वाचले जाते. पण कुठेही या नियतकालिकाची दखल घेतली जात नाही. विदर्भात निष्ठापूर्वक वाङ्मयीन कार्य करणाऱ्यांविषयी उर्वरित महाराष्ट्राला आस्था वाटत नाही का? सामाजिक कार्य निष्ठेने करणाऱ्या डॉ. सतीश गोगुलवार, शुभदा देशमुख, विजय विल्हेकार, गजानन काशिनाथ अमदाबादकर; या आणि अशा कितीतरी माणसांकडे महाराष्ट्राने फारसे लक्ष दिलेले नाही. वेगळ्या वाटा निवडून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी या संवादशास्त्र व माध्यमशास्त्रातील तज्ज्ञाच्या कार्याकडेही विदर्भासह महाराष्ट्राने आस्थेने पाहिलेले नाही. 'संवादशास्त्र' हा मराठीतील आधुनिक संवादशास्त्रावरील पहिलाच ग्रंथ, 'जाहिरातींचे शैलीशास्त्र' हा देखील मराठीतला पहिलाच ग्रंथ; असे महत्त्वपूर्ण लेखन, संशोधन करणाऱ्या डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे कार्यही अलक्षित का राहावे?

एकूणच काय, तर लेखन, संशोधन, समाजकार्य, कलेच्या क्षेत्रासह इतर अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारी विदर्भातील माणसे अनुल्लेखित का राहतात? ही स्थिती जशी विदर्भात तशीच मराठवाडा, खानदेश व कोकणातही असेल, त्यामुळे प्रदेशाच्या अस्मितेचा मुद्दा जरा बाजूला ठेवून पाहिले असता काय दिसते? तर प्रकाशन, लेखन, संशोधनाच्या मूल्यमापनाचे निकष आणि श्रेय नेहमीच मुंबई, पुणे व पश्चिम महाराष्ट्राच्या हाती असल्याचे दिसते. कला, साहित्य, सांस्कृतिक धोरणासह राजकारण, अर्थकारण आणि समाजकारणालाही प्रभावीत करणारे दृश्य-अदृश्य सत्ताकारण मुंबई, पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राभोवती फिरत आले आहे. प्रसारमाध्यमांसकट राजकारण्यांनाही विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण या प्रदेशांतील प्रत्यक्ष जनजीवन, कला, संस्कृती, साहित्य आदी बाबींची गंभीर जाण झालेली नाही, हे 'प्रगतिशील' महाराष्ट्राचे एक मोठे वैगुण्य होय. दुसरे म्हणजे, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण हे प्रांत आपले 'मागास' हे बिरुद पुसून टाकू शकलेले नाहीत, हे अप्रिय वाटत असले तरी सत्य आहे. विदर्भासारख्या प्रांताला आपली प्रादेशिक अस्मिता पुरेशी जोपासता आली नाही आणि महाराष्ट्रात राहून सत्ताकेंद्र आपल्याकडे सरकवताही आले नाही. विदर्भाच्या या राजकीय अपयशाची फळे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लेखक, कवी, प्रकाशक, संपादक, कलावंत, समाजसेवी मंडळींना नाइलाजास्तव भोगावी लागत आहेत. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माणसांमागे आणि त्यांच्या कर्तृत्वांमागे प्रादेशिक अस्मितांसह विदर्भ कधी उभा राहत नाही, हे कटू असले तरी सत्य आहे. विदर्भात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माणसांना देखील त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे चीज झाले की नाही हे ठरवायला मुंबई, पुणे व पश्चिम महाराष्ट्राच्या पंसती-नापसंतीच्या पावतीची, शेरेबाजीची गरज पडते कारण त्यांच्या कार्याची विदर्भाला तर अनेकदा माहितीच नसते. सांस्कृतिक अनभिज्ञतेच्या दारिद्र्यातून बाहेर पडण्याचा उपक्रम जेवढा सामाजिक तेवढाच वैयक्तिकही असतो. 'मागास' हे बिरुद सन्मानाने मिरवताना विदर्भाने हे समजून घेतले पाहिजे. साहित्य, संस्कृती, कला, क्रीडा, समाजसेवा आदी संदर्भातली सामूहिक आणि खासगीरीत्या बाळगलेली अनास्था उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माणसांची दखल घेणे, त्यांना दाद देणे, निष्पक्ष मूल्यमापन करणे वगैरे कृतींच्या आड आली आहे, हे जोपर्यंत विदर्भाला कळत नाही तोपर्यंत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माणसांचे कर्तृत्व अनुल्लेखितच असणार, हे कधी समजून घेणार? आपल्या सर्व कृती-कर्तृत्वाचे मूल्यमापन मुंबई, पुणे व पश्चिम महाराष्ट्र करणार असेल तर तेथील राजकारण आणि सांस्कृतिक सत्ताकारण तेवढे निष्पक्ष व प्रामाणिक असणारे आणि फक्त महाराष्ट्र अशा एकाच प्रदेशाची सामूहिक अस्मिता बाळगणारे नको का? असे निष्पक्ष व प्रामाणिक, सुजाण व प्रगल्भ, सजग व संवेदनशील सत्ताकेंद्र 'मागास' हे बिरुद असलेल्या विदर्भ व त्यासारख्या प्रदेशांनाच तयार करावे लागेल. अन्यथा अनुल्लेखाच्या नैराश्यमय अंधारात खितपत राहण्याशिवाय पर्याय नाही.

**– प्रा. अजय देशपांडे**
वामन घाट मार्ग, हनुमाननगर,
वणी-४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९८५०५९३०३०
srushti_ajay@rediffmail.com



प्रभाकर वाईरकर

## ओळख व्यंगचित्रकाराची

# केशव–लीला : व्यंगचित्रकार केशव

**प्रभाकर वाईरकर (व्यंगचित्रकार)**

एखादी व्यक्ती मी अमूक केले, तमूक केले, माझ्यामुळे हे घडले, मीच 'त्याचा' तारणहार वगैरे आत्मप्रौढी केवळ शब्दातून मिरवते, परंतु कृती शून्य असते, अशा माणसास आपण त्याची 'हवेत बाण मारणारा' म्हणून संभावना–कुचेष्टा करतो. परंतु बी.ए. रेड्डी सेंट्रल स्कूल–केंद्रीय विद्यालय, गोलकोंडा, हैदराबाद या शिक्षण संस्थेचे शिक्षक नेहमीच विद्यार्थ्यांना चित्रकलेसाठी प्रोत्साहित तर करत आणि त्या विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती वाढवण्यासाठी आपल्या शब्दरूपी वाग्बाणांचा मारा विद्यार्थ्यांवर सतत करत असत. हे वाग्बाण हवेतच सुसाट वेगाने परिक्रमण करून विद्यार्थ्यांच्या काळजात भिडत असत. सदर शिक्षकाने ड्रॉईंग हा विषय प्रत्यक्ष कृती करून दाखवण्याचा, शब्दातून व्यक्त करण्याचा नसूनही विद्यार्थ्यांमध्ये चित्रकलेची आवड व जडणघडण करण्याचे दिव्यकार्य करून दाखवले. त्यांनी विद्यार्थ्यांना कधीही फळ्यावर एकाही चित्रकलेसंदर्भात रेषाही काढून दाखवली नाही आणि अशा चित्रकला शब्दांतून निर्माण करणाऱ्या शिक्षकाचा चेला होता प्रसिद्ध व्यंगचित्रकार केशव (वेंकट राघवन). केशव यांनी कोणत्याही आर्ट स्कूलमध्ये जाऊन चित्रकलेसंदर्भात ॲकॅडमिक शिक्षण घेतले नाही किंवा त्यांना ते भाग्य मिळाले नाही. परंतु बी.ए. रेड्डी नामक शब्दरूपी कलासंस्थेचा विद्यार्थी होण्याचे भाग्य मिळाले आणि त्यातूनच पुढे त्यांनी चित्रकलेला वाहून घेतले.

केशव यांचा जन्म १९६१ मध्ये बंगलोर



केशव (वेंकट राघवन)

येथे झाला. त्यांचा स्वभाव भिडस्त, कमीत कमी बोलणारे, प्रथमदर्शनी धार्मिक वृत्तीचा माणूस वाटणारा असा वाटे. हा अबोल तरुण नेहमीच चित्रकलेच्या/व्यंगचित्रकलेच्या भाषेतूनच बोलायचा. कोणावरही काही टिप्पणी वा प्रसंग व्यक्त करण्यासाठी इतरांप्रमाणे शब्दांचा वापर न करता तो रेषांतून बोलू लागला.


केशव हे तसे पाहिले तर नशिबवानच. कारण अगदी तारुण्यातच त्यांना दिग्गज कलावंतांच्या कलेचा आस्वाद घेता आला. म्हैसूर येथील 'जयचामेराजेंद्र' या आर्ट गॅलरीमध्ये ज्या ठिकाणी दिग्गज कलावंत राजा रविवर्मा यांची चित्रे प्रदर्शित केली आहेत त्या गॅलरीमध्ये सतत जाऊन, यांच्या चित्रांचे चिंतन ते करू लागले. त्यातील बारकावे, रंगलेपन, रचना आणि चित्रकलेची परिमाणे यातून सतत स्वत:च अभ्यासू लागले.

भारतात कमी चित्रकारांना चित्रकला विश्वातील ताऱ्यांच्या प्रत्यक्ष कलाकृतीचा आस्वाद घेण्याचे भाग्य लाभले. त्यामध्ये केशव हे एक भाग्यवंत! कारण हैदराबाद येथील सालारजंग म्युझियममध्ये त्यांना जगविख्यात चित्रकार मायकेल अँजेलो, लिओनार्दो, राफेल वगैरे इंप्रेशनिस्ट कलाकारांच्या कलाकृतींचा अभ्यास करता आला आणि केशव यांच्या ब्रशला रंगाची पालवी फुटू लागली.


१९८० मध्ये 'आनंद विकटन्' या तामिळी मॅगेझिनमध्ये त्यांचे पहिले चित्र प्रसिद्ध झाले. त्या मॅगझिनच्या संपादकांनी 'मद्रास म्युझिक महोत्सवा'त जो दरवर्षी आयोजित केला जातो, त्यामध्ये त्या कलाकारांची कॅरिकेचर काढण्यासाठी ऑन–दी–स्पॉट – प्रोत्साहित केले व त्या ठिकाणी त्यांच्या जीवनातील व्यंगचित्रकलेची पायाभरणी झाली.

एखादा संपादक आपल्या व्यंगचित्र–कलेच्या जडणघडणीत किती उत्साही असतो याचे उदाहरण म्हणजे 'आनंद विकटन्'चे संपादक. त्यांनी केशव यांच्यामध्ये सतत स्केचिंग करण्याची आवड रुजवली, 'कलाकारी' निर्माण करण्यासाठी अद्भुत शक्ती दिली. याच काळात ते एका मोठ्या बँकेत 'बाबूगिरी' करत होते. डेव्हीड लो, विकी आणि 'पंच' मॅगझिनचे व्यंगचित्रकार तसेच भारतीय व्यंगचित्रकार अबू अब्राहम, आर. के. लक्ष्मण, शंकर, राजेंद्र पुरी व विजयन् यांची ओळखसुद्धा याच संपादकांनी करून दिली. माधव व टी.एस. श्रीधर यांचा उल्लेख ते व्यंगचित्रामध्ये विनोद व उपहास कसा करावा याचे धडे देण्यासाठी नेहमीच करतात.

१९८६ साली 'हिंदुस्थान टाइम्स' या









वृत्तपत्राने आयोजित केलेल्या नवोदित व्यंगचित्रकारांसाठी व्यंगचित्र व कॅरिकेचरच्या स्पर्धेमध्ये केशव यांना बक्षीस मिळाले व दिल्ली येथे पारितोषिक प्रदान करण्याच्या समारंभामध्ये अबू अब्राहम, मिकी पटेल, रंगा अशा दिग्गजांचे मार्गदर्शन मिळाले व त्यामुळे त्यांनी 'दि हिंदू' या वर्तमानपत्रामध्ये व्यंगचित्रकार म्हणून अर्ज केला व ते त्या ठिकाणी रुजू झाले. आजपर्यंत त्यांची सेवा ते सदर वृत्तपत्राला देत आहेत.

माझी आणि केशव यांची ओळख व मैत्री वरील समारंभामध्येच झाली. आजही केशव तसेच सुस्वभावी आहेत. मलाही त्यावेळी माझ्या आयुष्यात कार्टूनसाठी पहिलेच बक्षीस मिळाले होते.

'हिंदू'चे संपादक श्री.जी. कस्तुरी यांनी व्यंगचित्रकलेमध्ये काळ्या-पांढऱ्या जागेचे महत्त्व, रचना, कल्पनाशक्तीचा वापर, या दृश्यात्मक भाषेचा वापर, विचारांचे आदानप्रदान कसे करावे याचे शिक्षण दिल्याचे ते अभिमानाने सांगतात.


व्यंगचित्रकलेमध्ये प्रावीण्य मिळवण्यासाठी त्यांनी अनेक परदेशी व्यंगचित्रकारांचा अभ्यास केला. त्यामध्ये पॅट ऑलिफन्ट, मॅकनेली, 'पंच' व 'मॅड' मॅगझिनचे व्यंगचित्रकार, शूल्झ, वॉटरसन यांचा उल्लेख ते करतात. परंतु कोणत्याही व्यंगचित्रकाराची चितारण्याच्या शैलीची कॉपी त्यांनी कधी केली नाही, हे त्यांचे वैशिष्ट्य!

सुरुवातीची त्यांची जी व्यंगचित्रे मी पाहिली त्यावेळी मला त्यांची चित्रकलेची पद्धत अजिबात आवडत नव्हती. ही व्यक्ती एवढ्या युनिक कल्पना व्यंगचित्रामध्ये मांडत असताना ड्रॉईंगकडे का लक्ष देत नाही असा विचार यायचा.

त्यांच्या व्यंगचित्रकलेची वैशिष्ट्ये म्हणजे अतिशय परिणामकारक व वाचकांच्या विचारांवर परिणाम करणारी कल्पना, ड्रॉईंगमध्ये कमीत कमी बारकावे, बॅकग्राउंडमध्ये पाहिजे असेल तरच चित्रकारी, काळ्या-पांढऱ्या 'स्पेस'चा उत्तम वापर, ठसठशीत चित्रण, चित्रांच्या कल्पना 'अरे वाह!' असे उद्‌गार आपोआपच तोंडातून बाहेर पडव्यात अशा...

ते कोणत्याही राजकीय विषयावर, व्यक्तीवर, नेत्यांवर आपल्या ब्रशचा वापर करण्यासाठी घाबरत नाहीत असे वाटते. सतत 'गरिबी हटाव' आणि 'फील गुड'च्या फसव्या घोषणेच्या चक्रातून सामान्य माणसाची ससेहोलपट कशी होते हे दाखवण्यासाठी पार्लमेंटचेच फसवे चक्र दाखवले आहे. म्हणजे राजकीय नेते पार्लमेंटचा वापर सामान्यांच्या फसवणुकीसाठी कसा करतात याचे हे उत्तम उदाहरण.

राष्ट्रपिता म्हणून ज्या महात्मा गांधींचा उल्लेख अहोरात्र जे स्वार्थी राजकारणी करतात,. त्यांच्या दुतोंडी वागणुकीचे भेदक




चित्रण 'गांधीजींच्या ध्येयवादाचा-आदर्शवादाचा लिलाव अगोदरच केला आहे. निदान त्यांच्या पत्रांवर पुन्हा हक्क तरी सांगूया' या व्यंगचित्रातून अतिशय उपहासात्मक पद्धतीने दाखवले आहे. भोंदू राजकीय नेत्याचाच स्टॅम्प पॅड बनवला आहे. पुन्हा त्या पत्रांवर हक्क सांगण्यासाठी! जे स्टॅम्प पॅड पोस्टामध्ये वापरले जाते. (वरील प्रसंग एका परदेशस्थ व्यक्तीने त्याच्याजवळील गांधीजींच्या पत्रांचा लिलाव करण्याचे जाहीर केले त्यावेळचा आहे.)

संघटनात्मक व घरगुती समस्यांनी शिवसेनेची परिस्थिती काय झाली आहे व सेनापती कसे हतबल झाले आहेत, याचे उत्तम चित्रण सदरच्या व्यंगचित्रांमध्ये. त्याचप्रमाणे आर्थिक वाढीच्या धोरणाकडे घोडेकूच करण्यासाठीची घोडदौड लाकडी घोड्यांवरून करताहेत ते अर्थमंत्री चिदंबरम् त्यासाठी वापरत असलेले उपाय किती निर्जीव आहेत हे सहज लक्षात येते.

केशव यांना अनेक प्रथितयश व्यंगचित्रकारांचा सहवास लाभला. अबू अब्राहम यांनी त्यांना त्यांच्या घराचे बांधकाम कसे केले आहे याची ओळख करून दिली. कार्टून चितारताना पेन आणि इंक याचा कसा वापर करावा व ते ह्यासाठी नारळाच्या करवंटीमध्ये इंक ओतून पेनने चित्रे कशी काढतात हे दाखवले. त्याचबरोबर व्यंगचित्र करताना आपल्या संपादकाशी नेहमी विषयाचा विचारविनिमय करावा, ज्यामुळे व्यंगचित्रे छापण्यास १०० टक्के कशी मदत होते याचे मर्म सांगितले.

केशव यांनी आर.के. लक्ष्मण यांच्या घरी पीलाई येथे त्यांच्याबरोबर संपूर्ण दिवस व्यतीत केला. त्यामुळे आर.के. लक्ष्मण हे कसे नकला, मिमिक्री करून राजकीय नेत्यांची कशी रेवडी उडवतात हाही अनुभव केशव यांना घेता आला. तसेच, व्यंगचित्रकार विजयन् यांनी, त्यांच्या लेखनाविषयी माहिती देत असताना चित्रकला क्षेत्रामध्ये कसा धुडगूस चालू आहे याचीही माहिती दिली.



अनेक राजकीय नेत्यांनी केशव यांची पाठ थोपटली आहे. अरुण शौरी यांच्या हस्ते त्यांना १९९० मध्ये 'पंचजन्य' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. त्यावेळी बोलताना शौरी म्हणाले, केशव यांच्या व्यंगचित्रांसाठीच मी 'हिंदू' पेपर वाचतो. अर्थातच गमतीने!

त्यावेळचे संरक्षणमंत्री जसवंत सिंग यांनीही केशव यांच्या चित्रांना आपल्या मनाच्या कप्प्यात ठेवले आहे. एकदा तर त्यांनी त्यांची मूळ चित्रे मागितली, स्वत:कडे 'ठेवण्यासाठी'! तोच प्रकार ओमर अब्दुल्ला यांच्या बाबतीत घडला. त्यांची व्यंगचित्रे NCERT च्या क्रमिक पुस्तकामध्ये वापरण्यात आली. परंतु काही नतद्रष्ट नेत्यांच्या खोपडीतून निघालेल्या विषारी जंतूमुळे ती व्यंगचित्रे त्या पुस्तकातून काढून टाकण्यात आली. याचे वैषम्य केशव यांना खूपच बोचते.

जवळजवळ तीस वर्षे या क्षेत्रात असल्याने, अनेक वर्तमानपत्रे वाचावी लागल्याने अनेक नेत्यांच्या दुटप्पी धोरणाचा त्यांच्या बोलण्या-वागण्यातून अभ्यास करता आला, हीच त्यांची शिदोरी, असे केशव सांगतात.

केवळ व्यंगचित्रकार म्हणूनच केशव प्रसिद्ध नाहीत. ते एकलव्यासारखे शिकलेले उत्तम पेंटर-चित्रकारही आहेत. अनेक वर्षे त्यांनी 'कृष्ण' या विषयावर असंख्य पेंटिंग्ज तयार केली आहेत. काही चित्रे त्यांची 'मास्टर पीस' आहेत. त्यातील त्यांची लाइन, रंगकाम, त्यातील अलंकारिक बारकावे व एकूणच अलंकारिक चित्रकारी पाहून मन प्रसन्न होते.

कधी कधी वाटते, हीच स्टाईल त्यांनी व्यंगचित्रांमध्ये वापरली तर... त्यांची ही असंख्य पेंटिंग्ज फेसबुकवर अवश्य दररोज पाहता येतात. त्यांना आपण 'ॲड' करून घ्या आणि पेंटिंग्ज व व्यंगचित्रांच्या नवनवीनतेचा आनंद दररोज लुटा. असा हा कृष्ण - केशव!

**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# जग त्यांचं आणि आपलं

अपर्णा पाटील

बाईचं जिणं सगळ्या जगात सारखंच असतं. पण अरब जगातल्या महिला म्हणतील, तसं नाहीये मुळीच. रूढी, परंपरांचं ओझं त्यांच्या वाट्याला जरा जास्तच आलंय. त्यातून जवळपास प्रत्येकीचं आयुष्य शोकांतिका बनलंय. आता कुठे त्यांच्या अशा कहाण्या पुस्तकरूपाने बाहेर यायला लागल्या आहेत. त्यानंतरही त्यांच्या आयुष्यात काही फरक पडलेला नाही. उलट त्यांच्यावरची बंधनं अधिक वाढली असल्याची शक्यता नाकारता येत नाहीत.

अरब देशांतली अनेक पुस्तकं गेल्या दहा वर्षांत वेगवेगळ्या भाषांमध्ये अनुवादित झाली आहेत. काही चित्रपटही आले आहेत. त्यासाठी अमेरिकन लेखक, भाषांतरकारांनी पुढाकार घेतला. या कहाण्या लोकांसमोर आणण्याचा अमेरिकन स्वार्थ काही काळ बाजूला ठेवला, तरी स्त्रीच्या वाट्याला आलेलं जगणं पाहून आपला थरकाप होतो. अशा अनेक पुस्तकांपैकी दोन वेगळ्या पुस्तकांबद्दल इथे माहिती दिली आहे. विशेष म्हणजे दोन्ही कादंबऱ्या असल्या तरी त्यातल्या कथानकाशी लेखिकेच्या आयुष्याशी संबध जोडता येतो. दोन्हीत अरब राष्ट्रातील उच्चभ्रू महिलांच्या वाट्याला आलेलं दुःख आहे. त्यांच्याकडे सुबत्ता तर आहे, पण ती उपभोगण्यासाठीचा हक्क नाही. त्यांचं आयुष्य पिता, पती आणि पुत्र अशा पुरुषांच्या मर्जीवर चालतं. यातली एक कादंबरी आहे, रजा अल्सानियाची 'गर्ल्स ऑफ रियाद'. ज्यातल्या प्रेम, सेक्सच्या उल्लेखामुळे त्यावर बंदी घालण्यात आली. तर



सोहायर खशोगी

सोहायर खशोगी हिच्या 'मिराज' या कादंबरीमध्ये, पतीचा छळ आणि त्याच्या भूतकाळापासून दूर न जाऊ शकलेली अमीरा हिचं आयुष्य मांडलेलं आहे. ही कादंबरी वादग्रस्त ठरली नसली तरी त्यातले अनेक प्रसंग वास्तवाशी संबंध सांगणारे आणि वादग्रस्त नक्कीच आहेत.

**गर्ल्स ऑफ रियाद**

गर्ल्स ऑफ रियाद ही आहे चार मैत्रिणींची कहाणी. रियादमधल्या उच्चभ्रू वस्तीतल्या चारजणी. त्यांच्या आयुष्यात घडलेल्या गोष्टी. खरं तर जगातल्या इतर सगळ्या मुलींप्रमाणे त्यांचीही काही स्वप्नं आहे. तारुण्यात पदार्पण केल्यानंतर प्रत्येकीच्या मनात स्वप्नांचे इमले उभे राहतात. प्रत्यक्षात त्यांच्या आजुबाजूचं जग इतकं स्वप्नवत नाही, याची जाणीवही त्यांना त्याच वयापासून व्हायला लागते. पण त्यांचं आयुष्य जगातल्या इतर मुलींसारखं नाही. महागड्या गाड्यांमधून फिरू शकणाऱ्या या मुलींना साधं, सोपं आणि आपल्या मर्जीनं जगण्याचं स्वातंत्र्य नाही. त्यांच्या जगात शिरण्याचं स्वातंत्र्य आपल्याला नाही. म्हणूनच हे पुस्तक म्हणजे त्या झाकलेल्या जगात डोकावण्याची बारीकशी फट आहे.


गमरा, मिशेल, सदीम आणि लमीस या त्या मैत्रीण. कॉलेजमध्ये शिकत असतानाच्या एका वर्षाच्या कालावधीत त्यांच्या आयुष्यात नेमकं काय घडतं, त्याविषयीची ही कादंबरी. चौघींच्या आयुष्यात केवळ स्त्री आणि अरब जगातली स्त्री म्हणून आलेली दुःख मांडली गेलीत. लमीस, मिशेल (जिचे वडील सौदी आहेत आणि आई अमेरिकन आहे), गमरा, सदीम या प्रत्येकीच्या आयुष्याचा, पर्यायानं कथेचा केंद्रबिंदूच स्त्री-पुरुष हे संबंधच कसे इस्लामी रूढींनी जखडले गेले तो आहे. या मुलींना प्रेम हवं आहे. पण आपल्याला हवा तसा जोडीदार निवडण्याचं पुरेसं स्वातंत्र्य त्यांना नाही. त्यामुळे त्यांच्या अपेक्षांनाही मर्यादा आहेत. त्यांचं मागणंही फार नाही. पण तेही मान्य होण्यासारखी परिस्थिती नाही

औपचारिक लग्न करण्याआधीच तलाक देण्यासारखी प्रथा यात आहे. व्हॅलेंटाइन डे साजरा होतो पण चोरीछुपे. शहरात मोठमोठे मॉल आहेत, पण तिथे स्त्रियांनी आपल्या वडील, भाऊ किंवा पतीबरोबरच जाण्याचं बंधन आहे. बुरख्याशिवाय वावरण्याची बंदी आहे. हे सगळं कथानकाचा मुख्य भाग आहे. पुरुषांना जिथे स्त्रीचं नखंही दिसू न देण्याची काळजी

घेतली जाते, तिथे त्यांच्या वाट्याला मनासारखा जोडीदार तो कसा येणार? नातेवाईक असलेल्या पुरुषांच्या प्रेमात या मुली पडतात. पण त्यांच्याबरोबर उघडपणे फिरण्याची बंदी आहेच. अशावेळी एका ठिकाणी लेखिका लिहून जाते, रियादमधल्या टेलिफोन लाइन्स या सगळ्यात जास्त महत्त्वाच्या आहे. कारण दोन जीवांमधल्या संपर्काचं ते एकमेव साधन आहे. हे सगळं वाचताना हे लक्षात येतं, की पैसा असलेल्या या ठिकाणी भौतिक सुखसोयींना तोटा नाही. त्याचा वापर येथेच्छपणे करत आपलं आयुष्य हवं तसं जगण्याची मुभा फक्त पुरुषांना आहे, स्त्रीला नाही. आरामदायी आयुष्य तर तिला मिळालंय पण परंपरा, रीतीरिवाजांचं तिच्यावरचं जोखड मात्र अधिक जाचक आहे.

या कादंबरीत उम नुरीयार नावाचं एक महत्त्वाचं पात्र आहे. उम म्हणजे आई. नुरीयारची आई, आपलं घर या चौघींना खुलं करून देते. तिचा मुलगा अमेरिकेत राहून परतलाय. तो गे आहे. सौदीत गे असणं म्हणजे एड्सपेक्षाही भयंकर मानलं जातं. तिच्या मुलाचं नाव नुरी आहे, पण लोक त्याचा नुरीयार असा उल्लेख करतात. नुरीयारच्या आईचं दुःख हे वेगळंच आहे. पुस्तकात एकामागोमाग प्रत्येकीच्या आयुष्यातल्या शोकांतिकेचा थोडा थोडा भाग येत जातो. कॉलेजमध्ये हसण्याबागडण्याच्या वयात मुलींचं आयुष्य परंपरा आणि पुरुषी मानसिकतेमुळे कशी उद्ध्वस्त होतात, हे कादंबरीत येतं.

रजा अल्सानिया हिनं हे पुस्तक लिहिताना वापरलेला घाट आजच्या तरुणांना आवडेल असा आहे. दर शुक्रवारी ती एक प्रकरण लिहिते आणि ग्रुप ई-मेलच्या माध्यमातून फॉरवर्ड करते. प्रत्येक मेलची सुरुवात ती अरबी कवींच्या कविता किंवा खलिल जिब्रान, मार्क ट्वेनसारख्या लेखकांचे कोट्स देत करते. प्रत्येक मेलनंतरची प्रतिक्रियाही पुढच्या प्रकरणात मांडते. वाचकांना विशेषत: तरुणांना हा फॉर्म






आपलासा वाटतो. कारण त्या प्रकरणातल्या प्रतिक्रियांमधून आजच्या पिढीचं प्रतिबिंब दिसतं. एका ठिकाणी प्रत्येकजण या मेलमध्ये जे प्रकरण आहे, ते आपल्याच आयुष्यावर तर आधारित नाही ना, या विचारानं धास्तावलेत, असा उल्लेख येतो. तर मेल पाठवणारी व्यक्ती या चौघींपैकी कोण असावी, याविषयीचे तर्क लढवले जाताहेत, याविषयी लेखिका लिहून जाते. हे सगळं क्रिया-प्रतिक्रियांच्या पातळ्यांवरचं लिखाण आजच्या पिढीला आवडेल असंच आहे.

रजा अल्सानिया ही रियादमधल्या डॉक्टर कुटुंबातली मुलगी आहे. स्वतःही डॉक्टर. पंचविसाव्या वर्षी तिनं ही कादंबरी लिहली आहे. २००५ मध्ये जेव्हा ही कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हा त्यातला मजकूर वादग्रस्त ठरवला गेला. त्याच्यावर बंदी आणली गेली. पण काळ्या बाजारात त्याची तुफान विक्री झाली. अरब जगाला हलवून टाकणारी ही कादंबरी बेस्ट सेलर ठरली. ती २००८ मध्ये इंग्रजीत आणली गेली. मर्लिन बूथ यांनी ती भाषांतरित केली.


रजा अल्सानियाची ही कादंबरी वादग्रस्त आणि लोकप्रिय होण्याचं कारण म्हणजे, सौदी अरेबियातल्या महिलाचं तोवर दडून आणि दडपून टाकलेलं जग थेटपणे जगासमोर आलं. तिथल्या संस्कृतीचा, परंपरांचा थेट तिथल्या महिलांच्या खासगी आयुष्यावर कसा परिणाम झाला ते सांगणारं लिखाण मुक्तपणे लिहिलं गेलं. तिथल्या स्त्रियांना पाश्चिमात्य महिलांप्रमाणे सुखसुविधा तर मिळताहेत, पण त्यांचं स्वातंत्र्य, स्वप्न, आशाआकांक्षाचं काय तर छोट्या छोट्या गोष्टीतला आनंदही रीतीरिवाजांनी हिरावून घेतला आहे. त्यांना रियादमध्ये राहण्याची सक्ती नाही पण प्रेम, त्यांना हवं असलेलं सुख त्यांना मिळवायचं असेल तर सीमा ओलांडावीच लागतेय. पाश्चिमात्य जग आणि इस्लामी जग यांच्यामध्ये जी काही जागा आहे, त्यात त्यांनी आपली जागा शोधली आहे, हेच या कादंबरीत मांडलंय. या पुस्तकाला कादंबरी असं म्हटलं गेलं असलं तरी ते खुद्द लेखिका आणि तिच्या मैत्रिणींच्या आयुष्यातल्या घटनांवर आधारित आहे, यात शंका घ्यायला वाव नाही.

कादंबरी इ-मेलच्या रूपात लिहिताना त्यात प्रत्येकीचं आयुष्य उलगडण्याची एक वेगळी शैली आहे. मूळ कादंबरीचं नाव 'बनात अल-रियाद' असं आहे. पुस्तक वाचण्यासाठी सगळ्यात मोठं कारण असेल, ते म्हणजे रियादमधल्या मुलींचं आयुष्य नेमकं कसं आहे, हे जाणून घेणं. प्रेम, पुरुष आणि पैसा हे अरबांच्या जगात एखाद्या स्त्रीसाठी किती आणि कसं महाग आहे, याचंच दर्शन यातून होतं.

**मिराज**

मिराजची कथा सुरू होते, ती जेना सोरेलच्या बनावट जगानं. ती कोण आहे हे कळण्याच्या आतच तिला तिच्या घरातून पळवून नेलं जातं. एका खासगी विमानातून तिला अल-रेमालमध्ये नेलं जातं. मग साठच्या दशकातली अमीराची कहाणी उलगडत जाते. कादंबरीत फ्लॅशबॅक स्वरूपात अमेरिकेतल्या अमीरा ऊर्फ जेनाची कहाणी थेट अरब देशापर्यंत पोहोचते.

अमीरा बादीर ही अल-रेमाल या तेलांच्या खाणीनं संपन्न अशा देशात राहणारी आहे. लहान असताना अमीरानं आपल्या विवाहित मैत्रिणीला दगडानं ठेचण्याची शिक्षा झालेली पाहिली आहे. कारण त्या मैत्रिणीला तिच्या प्रियकरापासून दिवस गेलेले असतात. त्या मैत्रिणीच्या नवऱ्यानं दुसरी बायको घरी आणलेली असते. तरी शिक्षा मात्र तिला होते, त्याला नाही. अमीराचं लग्न राजपुत्र अली अल-राशीदशी होतं. अमीरा ही एका श्रीमंत आणि वजनदार घराण्यातली मुलगी आहे. पण लग्नानंतर तिला बुरख्याशिवाय वावरण्याची बंदी होते. सतत कोणीतरी तिच्याबरोबर असण्याची सक्ती तिला सहन करावी लागते. राशीद एरवी अत्यंत शांत समंजस आहे. पण काही वेळा त्याच्यातला मानव सैतानात रूपांतरित होतो. अत्यंत हिंस्र रूप धारण करतो. एक क्षण तर असा येतो, की अमीराला ती मरून जाईल इतपत मारहाण करतो. तिच्यावर बदफैलीचा आरोप करतो. मात्र तिच्यावर उपचार करणारा फ्रेंच डॉक्टर, ती आणि तिचा मुलगा यांना पळून जाण्यासाठी मदतही करतो. अमेरिकेत पोहोचलेली अमीरा तिचं वेगळं आयुष्य जगायला सुरुवात करते. कॉस्मेटिक सर्जरीच्या मदतीनं चेहरा बदलते. हॉवर्डमध्ये शिक्षण घेऊन मानसोपचारतज्ज्ञ होते. जेना या नावानं वावरणारी अमीरा महिलांच्या केसेस हाताळते. आपला भूतकाळ मात्र तिला विसरता येत नाही. ती सतत एका भयानं ग्रासलेली असते. आपला पती किंवा त्याचे विश्वासू साथीदार कधी ना कधी आपल्या शोधून काढतील आणि ठार




मारतील, असं तिला वाटत असतं. होतंही तसंच. पण त्या भीतीवर ती कशी मात करते, त्याची गोष्ट म्हणजे मिराज.

खरं तर, वरवर पाहता ही कादंबरी म्हणजे रोमँटिक फॅण्टसी वाटू शकते. पण ती कोणी लिहिली, हे लक्षात घेतलं तर त्याला वास्तवाची किनार आहे, हे समजून घेता येतं. त्यातले अनेक उल्लेख हे लेखिकेच्या घराशी संबंधित आहेत हे लक्षात येतं. कादंबरीत कुठेही सौदी असा उल्लेख नसला तरी त्याच्याशी साम्य सांगणारं बरंच काही आहे. शिवाय लेखिकेचं खशोगी हे आडनाव पहिल्यांदा लक्षात घ्यावं लागतं. खशोगी घराणं जगभरात ओळखलं जातं. सोहायर खशोगी ही याच सौदी अरेबियामधल्या प्रतिष्ठित घराण्यात जन्मलेली. शस्त्रसौदागर म्हणून प्रसिद्धी पावलेल्या अदनान खशोगी याची बहीण.

सोहायर इजिप्तची राजधानी अलेक्झांड्रीयामध्ये जन्मली. सौदीमधल्या डॉ. मोहम्मद खशोगी यांची ही कन्या. सौदी अरेबियातील ते पहिले डॉक्टर. राजे किंग अब्दुल अझी अल सौद यांचे ते खासगी डॉक्टर होते. देशात इलेक्ट्रीसिटी आणण्याचं श्रेय त्यांचंच. त्यांनी मुलांना चांगलं शिक्षण मिळावं, यासाठी अलेक्झांड्रीयाची निवड केली. त्यांची मुलं इंग्रजी शाळांध्ये शिकली. चौदा वर्षांची सोहायर अरेबिक, इंग्रजी आणि फ्रेंच भाषांत त्याचबरोबर कथा, पेंटिंग्ज यामध्ये तिनं चमक दाखवली. पुढे कॅलिफोर्नियात शिक्षण घेऊन बैरूतला स्थाईक झाली. सोहायरची बहीण समीरा हिचं लग्न मोहम्मद अल-फायेदशी झालं. त्यांचा पुत्र दोदी फायेद हा प्रिन्सेस डायनासह मारला गेला. म्हणजे सोहायरचं अख्खं घराणं हे ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत वादग्रस्त आणि पॉवरफुल. 'मिराज' ही सोहायरची पहिली कादंबरी. १९९६ मध्ये अमेरिकेत प्रसिद्ध झाली. ती ३७ भाषांमध्ये भाषांतरित झाली. त्यानंतर मोझाईक, नादीयाज साँग या कादंबरीतही त्यांनी अरब जग आणि तिथल्या महिलांचं आयुष्य मांडलं.

हे सगळं सांगण्याचं कारण इतकंच, की मिराजमध्ये अमीराचा पतीच्या घरातून पळून जाण्याचा, प्रिन्सेस डायनाच्या अपघाताचा उल्लेख येतो. पॅरिसमध्ये झालेला तो अपघात घडवून आणल्याचा सूचक उल्लेख करणं हे इतिहासातल्या वादग्रस्त घटनेबाबतच्या संशयाला बळकटी देणारं आहे. खरं तर सारं जग त्या घटनेबाबत चिडीचूप बसलं आहे. खशोगी घराण्यात जन्माला आल्यानं कदाचित पुस्तकावर बंदी वैगरे घालण्याचा फतवा आला नसावा. तसंच अमेरिकेत आणि थेट इंग्रजीत कादंबरी असल्यानं त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं असावं. अगदी लहान वयात तिचा पाश्चात्य जगाशी परिचय झाला. त्यामुळेच ती, अरब जगत आणि तिची जडणघडण झाली त्या पाश्चात्य जगातल्या अनुभवातून ही कादंबरी आकारास आली. त्यामुळे हे पुस्तक वादग्रस्त ठरलं नाही.


अमीराचं आपला भाऊ अली याच्याशी नातं या पुस्तकात आहे. हा अली थेट अदनानशी साम्य सांगणारा आहे. अमीराला पळून जाण्यासाठी अली मदत करतो. प्रत्यक्ष आयुष्यात सोहायरलाही अदनान खशोगीनं मदत केली. शिवाय अमीराचं लग्न राजघराण्यात झालं आहे, हे

सगळं सोहायरच्या आयुष्याशी निगडीत आहे. चोवीस वर्षांच्या सोहायरनं जेव्हा आपल्या मोठ्या मुलीसह देश सोडला तेव्हा अदनाननं तिला पळून जाण्यासाठी मदत केली होती. त्यामुळे पुस्तकातली अमीरा म्हणजे सोहायर आहे, अशी अटकळ सहज बांधता येते. सोहायर उच्चशिक्षित असूनही तिला पहिल्या लग्नापासून दूर जाण्यासाठी पळून जाण्याची वाट पत्करावी लागली. तिच्या आयुष्याचा पट पाहिला तर 'मिराज' म्हणजे सोहायरचं आत्मचरित्र आहे, असं म्हणायला काहीच हरकत नाही. त्यामधल्या घटनांचा संबंध धगधगत्या वास्तवाशी आहे.

सोहायर आणि रजा दोघी सौदीतल्या डॉक्टरांच्या मुली आहेत. पाश्चात्य जगताशी फार लवकर परिचय झाल्यानं त्यांच्यात लिखाण करण्याचं धाडस आलं. म्हणूनच 'मिराज' काय किंवा 'गर्ल्स ऑफ रियाद' काय दोन्ही पुस्तकांत आपली कहाणी थेटपणे मांडण्याइतकी अनुकूल परिस्थिती नसल्यानंच त्या कादंबरी म्हणून प्रसिद्ध झाल्यात. चरित्रात्मक लिहिण्यातले धोके त्यांना अधिक दाहक ठरले असते. दोघींच्या लिखाणात स्त्री आणि तिच्यावरील पुरुषांचं वर्चस्व, परंपरांच्या नावाखाली त्यांना गुलामसारखी दिलेली वागणूक यावर झोत टाकलाय, तरी त्यात बंडखोरीची भाषा मात्र नाही. जे आहे, ते असं आहे, असं मांडण्याचा सहजपणा त्याच्या लिखाणात आहे. अरब जगात स्त्रियांवर धर्माच्या नावाखाली जी बंधनं आहेत, त्याविषयी मात्र थेटपणे दोन्ही लेखिका लिहितात. तिथल्या पुरुषांच्या दांभिकपणाविषयी बोलतात, पण त्याविषयी त्या आक्रमक नाहीत. प्रत्येकीच्या आयुष्यात पुरुष किती केंद्रस्थानी आहे, याची जाणीव करून देतात. केवळ पुरुषानं ठरवलं म्हणून तो स्त्रीचं आयुष्य हवं तसं चांगलं वा वाईट करू शकतो, हे सांगतात. अरब स्त्री असल्यानं ती मुळातच सोशिक आहे. कारण रूढीची बंधनं इतक्या लवकर तोडून टाकणं त्यांच्याही आवाक्याबाहेरच आहे. फक्त त्यांना मुक्तपणे जगण्याची आस आहे. नेमक्या याच जाणिवेनं त्यांचं आयुष्यही आपल्यापेक्षा निराळं काही मागत नाही, हे समजून घेता येतं.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

**माझं साहित्यिक खटलं**
**ॲड. यशवंत हडप**




**मूळ किंमत २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**

१९२० ते १९४० या काळात आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमुळे वाङ्गमयेतिहासात मानाचे पान मिळवणाऱ्या वि.वा. हडप यांचे यशवंत विठ्ठल हे ज्येष्ठ चिरंजीव. वडिलांमुळे त्या काळातील प्रसिद्ध साहित्यिकांची घरात होणारी ऊठबस त्यांनी पाहिली होती. बऱ्याच लेखकांशी त्यांचा स्नेह जुळला एवढेच नव्हे तर खासगी आयुष्यातील सुख-दु:खाशीही ते समरस झाले. याचा परिपाक म्हणून यशवंत हडप यांनी वेळोवेळी हे लेख लिहिले.
मी, अभिजित यशवंत, जेव्हा माझ्या वडिलांच्या आयुष्याकडे पाहतो तेव्हा अवाक् होतो. त्या काळात शिक्षकाची नोकरी सोडून भागलपूरला जाणे, तीन वर्षांचा अभ्यासक्रम एका वर्षात पूर्ण करून एलएल.बी. ची पदवी मिळवणे, नाशिकला परत आल्यावर सर्व हितचिंतकांचे सल्ले न मानता स्वतंत्र वकिली सुरू करणे व त्यात यशस्वी होणे हे सर्व त्यांच्या जिद्दीमुळेच शक्य झाले असे मी मानतो.
वकिलीसारखा रुक्ष व्यवसाय करतानासुद्धा त्यांची विनोदबुद्धी शाबूत होती, नव्हे त्यांनी ती तशी जोपासली होती.
मला आठवते, एकदा एका प्रथितयश वकिलाचा मुलगा त्यांच्याविरुद्ध केस लढवत होता. त्याच्या उद्धटपणावर टीका न करता बाबा फक्त एवढेच म्हणाले, ''मला खात्री आहे की आपला स्वभाव आपल्याला वारसाहक्काने मिळालेला नाही.''
मी देव मानत नाही, पण ज्या कोणी आदिम शक्तीमुळे पृथ्वीची जडणघडण झाली व होते आहे तिच्या पायाशी एकच प्रार्थना, मला व माझ्या धाकट्या भावाला वडिलांची जिद्द, विनोदबुद्धी, कठीण परिस्थितीवर मात करण्याची क्षमता व सर्जनशीलता वारसाहक्काने मिळालेली असो.

**– अभिजित यशवंत हडप**



रविराज गंधे



# साहित्यिक आणि राजकारणी

**रविराज गंधे**

‘नेमचि येतो मग पावसाळा’ ह्या उक्तीप्रमाणे दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या ‘मराठी भाषा दिन’, ‘जागतिक पुस्तक दिवस’ आणि ‘साहित्य संमेलनां’च्या निमित्तानं साहित्यिक, वाचक, समीक्षक मंडळी मराठी भाषा आणि साहित्य याविषयी लांबुडका चेहरा करून चिंता वाहताना किंवा धाय मोकलून गळे काढताना दिसतात. मराठी भाषा अजूनही मंत्रालयाच्या दारात भिकेचा कटोरा घेऊन का उभी आहे? युनिकोडचा वापर का होत नाही? मराठी ही ज्ञानभाषा किंवा व्यवहाराची भाषा करण्याचा आग्रह आपण का करत नाही? शासनाच्या वेबसाइट मराठीतून का उपलब्ध नाहीत? अशा असंख्य प्रश्नांचा धुरळा ही जाणकार मंडळी उडवतात. ह्या मंडळींनी जर नीट निरीक्षण केलं तर हे सारे प्रश्न निरर्थक आहेत हे सहजी लक्षात येईल. आजच्या साहित्य संमेलनाचं स्वरूप पाहिलं तर, मराठी भाषा मंत्रालयाच्या दारात नसून ती मंत्र्यांच्या महालात बसली आहे असंच म्हणावं लागेल. संमेलनांना होणारी अलोट गर्दी पाहता, ती आता जनसामान्यांची भाषा म्हणूनही मान्य होऊ लागली आहे. तसंच, तिची उलाढालही कोट्यवधी रुपयांमध्ये व्हायला लागल्याने ती ‘व्यवहाराची भाषा’ म्हणूनही ओळखली जाऊ लागली आहे. मराठी भाषेचं अन् संमेलनाचं हे बदललेलं रूप जाणकार रसिकांच्या-वाचकांच्या कसं लक्षात येत नाही?

मायबाप जनतेच्या मनामध्ये मराठी भाषेचं साहित्याचं आणि संमेलनाचं स्थान अतिशय मोलाचं आणि श्रद्धेचं आहे, असा साक्षात्कार गेल्या काही वर्षांपासून राजकारणी मंडळींना होतो आहे. असा साक्षात्कार मराठीतील लेखक-साहित्यिकांना झाला असता तर मराठी साहित्यानं खूप मोठी झेप घेतली असती, परंतु तो रसिक-वाचकांच्या दुर्दैवानं राजकारणी मंडळींना झाला. कोणे एकेकाळी राजकीय मंडळींनी व्यासपीठावर बसावे की बसू नये एवढाच वाद होता. आता राजकीय मंडळींच संमेलनं भरवू लागल्यानं तो कालबाह्य होऊन हास्यास्पद झाला आहे. मतदारसंघ आणि मतदार ह्यांच्याशी मांडवली करण्याचं अंगभूत कौशल्य अंगी असलेल्या राजकीय मंडळींना अध्यक्षपदांच्या निवडणुका ह्या ‘किस झाड की पत्ती’ वाटू लागल्या. त्यामुळे साहित्य संमेलनाचा अध्यक्ष ठरवण्यापासून संमेलनाचे सर्व कार्यक्रम-उद्घाटक-अतिथी, सर्व प्रकारचे मोर्चे, निदर्शनं, दंगे, वादग्रस्त विधानं, ऐतिहासिक व्यक्तींचं चारित्र्यहनन आदी सर्व गोष्टींचे अधिकार राजकीय मंडळी आणि राजकारणप्रेरित संघटनांना मिळाल्यानं त्यांच्या प्रत्येक कृती आणि उक्तीला साहित्यरत्नांची झळाळी प्राप्त होऊ लागली. आता महाराष्ट्राची राजेमंडळीच साहित्य संमेलन भरवत असल्यानं सर्व गोष्टी त्यांच्या प्रतिष्ठेला, लोकप्रियतेला अन् ऐश्वर्याला साजेशा होणं ओघानंच आलं. एकेकाळी साधेपणानं साजरी होणारी संमेलनं भव्यदिव्य झाली. सहस्रभोजनाच्या जेवणावळी झडू लागल्या. त्याचा सुगंध आसमंतात दरवळू लागला.

एकेकाळी राजकीय मंडळी साहित्य हे काही आपलं क्षेत्र नव्हे असं समजून त्यापासून चार हात लांबच राहत. साहित्यदुर्गा दुर्गा भागवतांनी कराड साहित्य संमेलनात यशवंतराव चव्हाणांना सुनावल्यापासून सर्व राजकारणी मंडळी साहित्यिकांना टरकून असत, अगदी ‘जाणता राजा’ शरद पवारांपासून महाराष्ट्रातल्या तमाम आमदार-खासदारापर्यंत! अर्थात बाळासाहेब ठाकरे यांचा अपवाद वगळता!

वास्तविक, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत, राजेरजवाडे आणि राजकारणी मंडळींचा मोलाचा वाटा आहे. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड, कोल्हापूरचे शाहू महाराज साहित्य-संगीत-नाटक आदी कलांचे निस्सीम चाहते होते. चित्रकार राजा रविवर्मा, बालगंधर्व, बाबूराव पेंटर, अल्लादियाँ खाँ यांसारख्या दिग्गज कलावंतांना या राजेमंडळींनी उदंड प्रोत्साहन दिलं. आर्थिक साहाय्य केलं. स्वातंत्र्या-नंतरच्या काळात जवाहरलाल नेहरू, यशवंतराव चव्हाण अशा अनेक सुसंस्कृत आणि रसिक वृत्तीच्या राजकारणी मंडळींनी ही परंपरा पुढे चालू ठेवली. यशवंतराव चव्हाण तर साहित्यिक-कलावंताचे मोठे चाहते होते. ते स्वत: एक संवेदनशील लेखक आणि चोखंदळ वाचक होते. अनेक साहित्यिक-लेखकांशी त्यांचा व्यक्तिगत स्नेहसंबंध होता. आपल्या कारकिर्दीत

त्यांनी साहित्य संस्कृती मंडळ, एनसीपीएसारख्या विविध संस्थांची उभारणी केली. गदिमा, ना.धों. महानोर यांसारख्या साहित्यिक-कवींना त्यांनी विधानपरिषदेचं सदस्यत्व दिलं. नंतरच्या काळात शरद पवार आणि अन्य साहित्यप्रेमी, साहित्यकलांचं महत्त्व जाणणाऱ्या राजकारणी मंडळींनी हा वारसा पुढे चालवला. बाळासाहेब ठाकरे यांसारखा रसिक कलावंत राजकारणी विरळाच! राज ठाकरे यांनी तर 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने'ची स्थापना केल्यानंतर शिवाजी पार्कवर भव्य पुस्तक प्रदर्शन आयोजित करून आपलं गंथ्रप्रेम व्यक्त केलं. सुशीलकुमार शिंदे, यशवंतराव गडाख, सुनील तटकरे, उल्हास पवार, सुभाष देसाई, विनोद तावडे अशी काही रसिक राजकारणी मंडळी साहित्य-कलाविषयक उपक्रमांना सदैव प्रोत्साहन देत आलीत. याविषयी कुणाचं दुमत असण्याचं कारण नाही. प्रश्न आहे तो सोयीसोयीनं आणि चलाखीनं प्रसंगपरत्वे साहित्यक्षेत्राचा आणि साहित्यिकांचा वापर करण्याच्या वृत्तीचा. अलीकडे होणाऱ्या सर्व संमेलनांमध्ये व्यासपीठावर व इतरत्र मंत्री, आमदार-खासदार यांची एवढी गर्दी असते की हे साहित्य संमेलन आहे की पक्षाचं अधिवेशन हेच कळेनासं झालं आहे.

अर्थात, अशी परिस्थिती निर्माण व्हायला आपले काही थोर राजकीय निष्ठा असलेले सरकाराभिमुख साहित्यिक-कलावंत आहेत हेही तेवढंच खरं. सरकारच्या विविध समित्यांचं-महामंडळाचं अध्यक्षपद किंवा सदस्यत्व मिळावं, पुरस्कार किंवा अनुदान मिळावं म्हणून मंत्रालयाचे उंबरठे झिजवणारे साहित्यिक-कवी आहेत. गटबाजी करून आपल्याच कंपूतील पुस्तकांचा-लेखकांचा उदो उदो करणं, त्यांना पुरस्कार मिळवून देणं, एकमेकांचा पत्ता कट करणं, स्वत:विषयी गोड गैरसमज बाळगून इतरांबद्दल तुच्छभाव दर्शवणं, अध्यक्षपदांच्या निवडणुकांमध्ये जातीय पातळीवर प्रचार करणं असे साहित्यबाह्य उद्योग ही मंडळी करतात. काही प्रकाशक आपले लेखक असलेल्या संपादक-पत्रकारांना हाताशी धरून महाराष्ट्रातल्या अग्रगण्य वर्तमानपत्रांमधून पुस्तकांचं मार्केटिंग करतात. मराठी साहित्यिक-कवींमधील अस्मितेचा आणि एकीचा अभाव, अगतिक आणि लाचार वृत्ती राजकारणी मंडळी बरोबर हेरतात आणि त्याचा वापर करतात.

दीड-दोन दशकांपूर्वी सुनीता देशपांडे यांनी शरद पवार यांचे 'महाराष्ट्र टाइम्स'मधून जाहीररीत्या कान टोचल्यानंतर देखील त्यावर पवारांनी 'वयानं ज्येष्ठ माणसं आहेत. आपण त्यांच्याबद्दल काय बोलणार?' अशी सावध प्रतिक्रिया दिली होती. साहित्यिकांचा त्याकाळी इतका दरारा होता. त्याच शरद पवारांनी चिपळूण येथील साहित्य संमेलनातील आपल्या भाषणांत जगभरातल्या सर्वश्रेष्ठ शंभर कथांमध्ये मराठी भाषेतील एकही कथा का नाही, असा रोकडा सवाल केला. आजच्या साहित्यिकांनी अंतर्मुख होऊन याचा विचार करण्याची गरज असल्याचं सांगितलं, हेही लक्षात घ्यायला हवं.

काही दिवसांपूर्वी प्रकाशकांच्या तक्रारीवरून मुंबई पोलिसांनी मराठीतील पायरेटेड पुस्तकांच्या विक्रेत्यांवर धाडी टाकल्या. त्यात जी पुस्तके गवसली त्यात भालचंद्र नेमाडे, जी.ए. कुलकर्णी यांच्या कथा-कादंबऱ्या अथवा कवी कुसुमाग्रज-ग्रेस यांचे कवितासंग्रह नव्हते. मोठ्या प्रमाणावर सापडलेल्या पुस्तकांमध्ये वि.स. खांडेकरांची 'ययाति', रणजित देसाईंची 'स्वामी' आणि 'मृत्युंजय', 'छावा', 'पानिपत', 'श्यामची आई' अशा साठ-सत्तरच्या दशकांतील गाजलेल्या साहित्यकृतींच्या प्रती मिळाल्या. नंतरच्या काळात निर्माण झालेल्या नवसाहित्याची, दलित साहित्याची सर्वसामान्य वाचकांना ओळखच झाली नाही का? राज्यस्तरावर ही स्थिती; तर जागतिक पातळीवर काय विचार करणार? जागतिक पातळीवरचा नोबेल पुरस्कार मिळवणारा माणूस बंगाली होता मराठी नव्हे! चार-दोन अपवाद वगळता किती मराठी साहित्यकृतींचा इंग्रजी वा परकीय भाषेत अनुवाद झालाय? मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा अजूनही मिळालेला नाही. महाराष्ट्रातल्या निम्म्या जिल्ह्यांमध्ये वाचनालयं नाहीत. पुस्तक प्रदर्शनातील कोट्यवधी रुपयांची विक्री ही उपयुक्ततावादी पुस्तकांची, चरित्र-आत्मचरित्रांची असते; कथा-कादंबऱ्यांची नाही. साहित्यातील नवनवीन प्रवाहातील अनेक दमदार आणि दर्जेदार लेखक-कवींची खऱ्या अर्थानं अजून महाराष्ट्रातील जनसामान्यांना आपण ओळख करून देऊ शकलो नाही. परिणामत: मराठी वाचकांमध्ये अजूनही सुहास शिरवळकर, योगिनी जोगळेकर, व.पु. काळे, ज्योत्स्ना देवधर आदी जुनी-जाणती लेखकमंडळीच वाचकप्रिय असल्याचं आढळतं. ह्या पार्श्वभूमीवर साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्था नेमकं कुठल्या प्रकारच्या वाचकांचं जनजागरण करतात किंवा वाचनसंस्कृतीचा नेमका काय प्रसार होतो आहे याचा साहित्यिकांनी विचार करण्याची गरज आहे.

पवारांच्या ह्या ऐतिहासिक विधानाचा नेमका काय अर्थ आहे हे उपस्थित राजकीय मंडळींना नीटसं जरी कळलं नसलं तरी आता यापुढे सर्व साहित्यसंमेलनामध्ये आपल्यालाच मार्गदर्शन करावे लागेल अशी खूणगाठ सर्वांनी मनाशी बांधली. तिथे उपस्थित असलेल्या तुरळक चार-दोन साहित्यिकांनी पवार काहीतरी जागतिक साहित्याविषयी बोलतायत असं समजून त्याकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केलं. तर अन्य राजकारणी मंडळींनी लेखक-वाचकांना मार्गदर्शन करताना, आपापल्या भाषणात, शाळा-कॉलेजमध्ये असताना आपण 'श्यामची आई' कशी वाचली, स्नेहसंमेलनात बालकवींच्या कविता कशा म्हटल्या, स्वामी वाचल्यावर कसे ढसाढसा रडलो याची रसभरीत वर्णनं केली. साहित्य

संमेलन भरवण्याचा आपलाच जन्मसिद्ध अधिकार कसा आहे हे सिद्ध केलं आणि संमेलन अलगद राजकारण्यांच्या कडेवर जाऊन बसलं.


गेल्या महिन्यात नेरूळला संत साहित्यसंमेलन पार पडलं. महाराष्ट्रातील संत साहित्याचे अभ्यासक लेखक-कवी-जे उठता-बसता संत तुकाराम अन् ज्ञानेश्वरांचं नाव घेतात - ते कुणीच संमेलनाकडे फिरकले नाहीत. संमेलनामध्ये राष्ट्रवादीचे संत राजकारणी मोठ्या संख्येनं हजर होते. शरद पवार यांनीच संमेलनाचं उद्घाटन केलं! संमेलनातील विविध विषयांवरील परिसंवादामध्ये सहभागी होऊन संत राजकारण्यांनी आपले आध्यात्मिक अनुभव लोकांना कथन केले.

सरतेशेवटी असा प्रश्न उपस्थित होतो की सारी संमेलनं ही राष्ट्रवादी किंवा काँग्रेसमधल्या साहित्य रसिकांनीच भरवायची का? इतर राजकीय पक्षांत साहित्यरसिक नाहीत का? शिवसेना-बीजेपी-मनसे-सपा-बसपा यांनादेखील आपापला मतदारसंघ बळकट करण्याची इच्छा असेलच. आळीपाळीनं सर्वांना गावजेवण घालण्याची संधी मिळायला हवी. अर्थात ही कोट्यवधीची उड्डाणं त्यांना झेपली पाहिजेत हेही खरंच आहे. त्यामुळे गरीब राजकीय पक्षांनी संमेलनं भरवण्यास साहित्य महामंडळाची तत्त्वत: मान्यता असेलही, परंतु हे शिवधनुष्य नेमकं कुणाला पेलता येईल याचा सारासार विचार करूनच महामंडळाला निर्णय घ्यावा लागेल.

आता साहित्य संमेलन कोण भरवतो याविषयी लेखक-साहित्यिकांनाच काही देणंघेणं नसतं तिथे सर्वसामान्यांना काय असणार? संमेलन कुणीही का भरवेना, तीन दिवस नाच-गाण्यांचे-नाटकांचे धमाल कार्यक्रम असणार. नट-नट्या पाहायला मिळणार याची वाचक-रसिकांना खात्री पटली. हां! अधुनमधून भाषणबाजी अन् रटाळ परिसंवाद सहन करावे लागतील म्हणा! एवढं सोडलं तर बाकी आनंदोत्सवच! शिणलेल्या जीवाला दोन घटका करमणूक मिळाली की लोक आनंदानं टाळ्या पिटू लागतात आणि अन्नछत्राकडे चालू लागतात. सहस्रभोजनं रंगू लागतात. पंचपक्वान्नांची तारीफ करत जनता-जनार्दन भाऊ-तात्यांना दुवा देऊ लागतो. भाऊ-तात्या खूष होतात. मनोमन देवाला प्रार्थना करतात, आमच्या संमेलनांना साहित्यिक येवोत-न येवोत, परंतु जनता-जनार्दनाच्या जिभेवर चविष्ट मोदकाची अन् गाजर हलव्याची चव मात्र २०१४च्या निवडणुकीपर्यंत घोळत राहो म्हणजे झालं!

**- रविराज गंधे**
५८/८ बसंतस्मृती, पांडुरंगवाडी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com

**आठवणींच्या जगात**
**जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
**निरुपमा प्रधान-सोनाळकर**




**मूल्य ३०० रु.**
**सवलती १८० रु.**

**दुसरी आवृत्ती प्रसिद्ध!**

''भारतीयांना जर्मनीविषयी कुतूहल आहे, पण तेथील जीवनाविषयीची माहिती मात्र फार नाही. निरुपमा प्रधान या सोनाळकर झाल्या नसत्या तर कदाचित त्यांचाही जर्मनीशी इतका जिव्हाळ्याचा संबंध आला नसता. गजबजलेल्या मुंबईतून हॅम्बुर्गजवळील ल्युनेबुर्गमध्ये जाऊन तेथे संसार थाटायचा, हेच एक आव्हान होते. निरुपमा यांनी मात्र सुरुवातीला खाणाखुणा, हावभाव अशा माध्यमातून, नंतर मोडक्या-तोडक्या जर्मन शब्दांमधून आणि शेवटी अस्खलित जर्मन भाषेतून तो अवघा देश मनाने पादाक्रांत केला. त्या पस्तीस वर्षांच्या काळात निरुपमा प्रधान-सोनाळकर या आपल्या देशाच्या 'अनभिषिक्त' राजदूत म्हणूनच तेथे वावरल्या.
जीव की प्राण असलेले बॅडमिंटन सोडून हे नवीन जीवन त्यांनी स्वीकारले होते. आपणहून नव्हे, तर नियतीच्या प्रवासात जर्मनी नावाचे 'स्टेशन' लागल्यावर. त्यानंतर मात्र ट्रॅव्हल-टूर्सच्या माध्यमातून कितीतरी अधिक 'स्टेशन्स' निरुपमाबाईंनी घेतली. एकामागोमाग लहान-मोठे किल्ले सर करावे त्याप्रमाणे त्यांनी मॉस्को असो वा ब्रिस्बेन, टोरोंटो असो वा जकार्ता, खाटमांडू असो वा थिंपू (भूतान) असे सर्व देश 'जिंकले'! भारत तर त्यांचाच होता.
जर्मनीचे अंतरंग उलगडणाऱ्या निरुपमा सोनाळकरांच्या या 'आठवणींच्या जगात' खरोखरच इतके जग त्यांनी सामावले आहे, की वाचक थक्क व्हावा.''
- कुमार केतकर



# वाचनसंस्कृती जपणारे दत्तात्रय सांब कुळकर्णी

## सुनंदा शरद मोने

सकाळची वेळ! हातात वर्तमानपत्र आणि चहाचा आस्वाद घेत सहज रस्त्याकडे नजर टाकली तर एक व्यक्ती कधी हातात मासिकांचा गठ्ठा, कधी काळी सायकलवर, तर कधी पायी लगबगीने जाताना दिसे. अनेक वर्षे असे निरीक्षण केल्यावर मनात कुतूहल निर्माण झाले, त्या व्यक्तीशी बोलून यासंबंधी जाणून घ्यावे या हेतूने केलेला हा शब्दप्रपंच.

ही व्यक्ती म्हणजे कल्याणचे डी.एस.के. (बिल्डर नव्हे) दत्तात्रय सांब कुळकर्णी. विकास वाचनालयाचे मालक, सर्वेसर्वा.

प्रश्न : आपला जन्म, लहानपण, मूळ गाव यासंबंधी थोडेफार.

''कुळकर्णी परिवार खानदेशातील सावदा स्टेशनपासून ३ मैलांवर असलेले मंगलवाडी या छोट्याशा खेडेगावातील रहिवासी. एकत्र कुटुंब असलेल्या मोठ्या परिवारात बालपण गेले. वडील सांब हरी कुळकर्णी नोकरीनिमित्त सन १९४२/४६ दरम्यान कल्याणला आले. त्यामुळे कल्याण हीच कर्मभूमी झाली. बालवाडी ते ४थी पर्यंतचे शिक्षण, नलिनी निवास, बालक मंदिर व नंतर ज.ए.इ.चे हायस्कूल सुभेदारवाडा येथे माध्यमिक शिक्षण, नंतर बिर्ला कॉलेजमध्ये प्रवेश घेतला परंतु शिक्षण अर्धवट सोडून व्यवसाय सुरू केला. मला चार भाऊ, एक बहीण. संस्काराचे बाळकडू आई इंदिराबाई हिच्याकडून मिळाले आणि बालक मंदिर व सुभेदारवाडा ह्या शाळांमधून ते संस्कार जोपासले गेले.''

प्रश्न : शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी न करता व्यवसायाकडे वळावे असे का वाटले व वाचनालयाचाच व्यवसाय का निवडला?

''शालेय जीवनापासूनच नोकरी करायची नाही असे निश्चित ठरवले होते. ह्याचे प्रेरणास्थान आमचे मुख्याध्यापक र.वि. सोमण सर. तेच माझे श्रद्धास्थान होते.

शिक्षण चालू असतानाच मंगलवाडी येथे सुट्टीत गेल्यावर शेतीची कामे करण्याची आवड होती. गाई-म्हशींची देखभाल करणे, त्यांना वेळेवर दाणापाणी देणे, दान देण्याची सवय तसेच जळगाव येथे गेल्यावर मावस बहिणीच्या नाईक सायकल मार्ट दुकानात कामाचे निरीक्षण करणे, हवा भरून देणे, पंक्चर काढणे इत्यादी छोटी-मोठी कामे करून व्यावसायिकांचे संस्कार होत गेले. गोवंडी येथे महेश कपोले ह्या मित्राच्या आईचे वाचनालय पाहिले, शिवाय मला पुस्तके वाचनाची आवड होतीच. यातून वाचनालय सुरू करावे असे ठरवले. पण वेगळेपण असे, की प्रत्येकाच्या घरी जाऊन मासिक बदलण्यासाठी फिरते वाचनालय कल्याणमध्ये सुरू करण्याचे ठरवले.

१ मे १९७२ (महाराष्ट्र दिन) रोजी १३ सभासद/महिना २.५० वर्गणी आणि जमवलेले भांडवल रुपये ३० यावर वाचनालय सुरू केले.''

प्रश्न : व्यवसायाची वाटचाल/प्रगती कशी झाली?

''हातातील मासिकांचा गठ्ठा पाहून नवीन सभासद मिळत गेले. गेल्या ४० वर्षांत मासिकांची सभासद संख्या १५०-२०० पर्यंत वाढली व दिवाळी अंकासाठी ४००-५०० सभासद मिळाले. याच काळात वाचनालयासाठी गुढीपाडवा, २८ मार्च १९७९ रोजी भाड्याची जागा व नंतर भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या वाड्यात, सन १९८२ साली स्वत:च्या मालकीचा गाळा घेतला. मासिकांच्या वाढत्या किमतीमुळे वर्गणीत वाढ करावी लागली, मात्र सभासदसंख्याही वाढत होती. १ जून १९८६ रोजी विकास स्टोअर्स ह्या नावाने शालेय साहित्य व पुस्तके/कथा-कादंबऱ्या पुरवण्याचा जोड व्यवसाय सुरू केला. हा सर्व प्रपंच करत असताना सर्व भाऊ, पत्नी जयश्री, कन्या रूपाली व कनक यांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळत गेल्याने स्थैर्य मिळाले. एकाच कुटुंबातील ३ व्यक्ती ग्रंथपाल असणे हा दुर्मिळ योग मला लाभला. पत्नी जयश्री ग्रंथपाल म्हणून शाळेत नोकरी करत असल्यामुळे आर्थिक मदत होत होती. कल्याणातील अनेक व्यक्तींनी सदैव आर्थिक मदत केल्यामुळे व्यवसायात आनंद मिळाला.''

प्रश्न : गेली ४० वर्षे आपण वाचकांच्या संपर्कात आहात. वाचकांची अभिरुची, वाचनाची आवड, वाचन संस्कृती यात कसा बदल झाला आहे, आपल्या निरीक्षणावरून वाचनाचे प्रमाण, लेखकांच्या साहित्याचा दर्जा यात उणेपणा जाणवतो का?

''गेल्या ४० वर्षांत प्रसारमाध्यमांचा वाढता प्रभाव (दूरदर्शन/संगणक), नोकरी, प्रापंचिक-सामाजिक ताणतणावाचा परिणाम यामुळे बदल हे निश्चितच घडत गेले.



पूर्वी व्यवसाय वा नोकरी करणारे लोक लोकलच्या प्रवासातही वाचत होते. वाढती गर्दी, तणाव यामुळे आता हे शक्य होत नाही. पण त्याचबरोबर विविध विषयांना वाहिलेल्या मासिकांचे प्रमाण वाढले. जसे आध्यात्मिक, आरोग्यविषयक, भविष्य, वास्तुशास्त्र, वैज्ञानिक-साहित्य, कौटुंबिक मासिके, स्त्रियांसाठी, तरुणांसाठी अशी विविधता मासिकांच्या विषयातून आल्यामुळे आपल्या आवडीनुसार वाचणारा वाचकवर्ग नक्की मिळतो. नैमित्तिक कारणामुळे नवीन नवीन मासिके/पुस्तके निघतात. जसे कुसुमाग्रज जन्मशताब्दी, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद, यशवंतराव चव्हाण, सानेगुरुजी इत्यादींवरील पुस्तकांनाही वाचकांचा प्रतिसाद मिळतो. अनेक प्रकाशक चांगली पुस्तके काढण्यासाठी प्रयत्न करतच असतात. त्यात ग्रंथाली, मॅजेस्टिक, राजहंस, मेहता, पुरंदरे, अमेय अशा प्रकाशकांचा मोठा वाटा आहे. ज्याला वाचनाचा छंद आहे तो सदैव वाचनच करत असतो, असा अनुभव आहे.''

प्रश्न : आपल्या व्यवसायातून आपण अनुभवसंपन्न कसे झालात, काय कमावले/गमावले असे आपणास वाटते?

''व्यवसायाची वाटचाल करताना अनेक अनुभव आले व त्यातून खूप काही शिकता आले. वेळेचे उत्तम नियोजन केल्यामुळे प्रत्येक सभासदाकडे आठवड्यातून दोन वेळा जाण्याचा क्रम चुकला नाही. सभासदांचे आतुरतेने वाट पाहणे, वेळ न मोडता मासिके बदलणे, आपुलकीची चौकशी यातून जनसंपर्क वाढला. लोकांच्या सुखदु:खात सहभागी होण्याची संधी मिळाली. पैशाला अवास्तव महत्त्व न दिल्याने हे समाधान मिळाले.

एकच मोलाची गोष्ट गमावली, ती म्हणजे पत्नीचा अर्ध्या संसारातील वियोग.''

सहज प्रश्न विचारत असताना आपली तत्त्वे, ध्येय यासंबंधी कुळकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

''आपल्या प्राप्तीपैकी काही भाग हा समाजऋण फेडण्यासाठी वेचताना, विविध शैक्षणिक-आदिवासी सामाजिक संस्थांना मदत केली. यासंबंधी कुठे वाच्यता केली नाही. केलेल्या कार्याची पावती अनेकांकडून मिळाली. रोटरी क्लब, ब्राह्मण सभा, पुण्याची ग्राहक पेठ, जनादेश पेपर (ठाणे), पारनाका शिवसेना शाखा, आम्ही कल्याणकर यांजकडून सत्कार प्राप्त झाले.

व्यवसाय छोटा असला तरी त्यानिमित्ताने प्रतिष्ठित श्रेष्ठ व्यक्ती- मा. बाबासाहेब पुरंदरे, लालकृष्ण अडवाणी, बाळासाहेब ठाकरे, सुषमा स्वराज, राम नाईक, रामभाऊ म्हाळगी, राम कापसे, अनेक आमदार/खासदार, अनेक प्रकाशक मित्र मिळाले. अनेक कलाकार, नाटककार आदी माननीय व्यक्तींचा सहवास मिळाला. सुहृद, हितचिंतकांच्या सदिच्छा लाभल्या. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा माणसांची श्रीमंती मिळाली. त्यामुळे कृतार्थता/समाधान आहे.''

प्रश्न : कोणत्याही व्यवसायाला निवृत्तीचे बंधन नसते. गेली ४१ वर्षे व्यवसाय केल्यानंतर आता यापुढे आपला मानस काय आहे?

''वयाची साठी आल्यानंतर फिरत्या वाचनालयाला विराम द्यावा अशी मनोधारणा आहे. व्यवसाय व संसार करत असतानाही सामाजिक कामे होत होतीच. पुढेही चालू राहतील.''

**- सुनंदा शरद मोने**
कल्याण


शब्द तर कुली आहेत
**भावानुवाद : राजेंद्र काटदरे**




बुद्धाला शूद्र प्रेताने
ते सांगितले
जे संभव नव्हते
धर्माचार्यांच्या पिढ्यांना!

प्रकाश
जिन्यातून उतरत नाही
धरत नाही कठड्यांना!

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने


















स.न.वि.वि.

'संकल्पनाकोशा'चे पाचही खंड चाळून पाहिले. त्यासाठी प्रत्येक खंडातील विभागांमधील एक-एक शब्द वा विषय घेऊन तो शब्द, त्याचा अर्थ, प्रतिशब्द, त्या शब्दाचे संदर्भानं येणारे अन्य शब्द, व्युत्पत्ती, इंग्रजी भाषेतील संदर्भ, ऐतिहासिक संदर्भ असं सर्वकाही जिथल्या तिथं, अचूक मिळालं. सुरुवाती-सुरुवातीला खूप बरं वाटलं. खूष झालो आणि जसजसा खोलवर जाऊ लागलो तसतसा थक्क होत गेलो. त्यानंतर मात्र मिळणाऱ्या ज्ञानानं स्वत:च्या अज्ञानाची लाज वाटू लागली. आता पाचही खंड हाताशीच ठेवलेत. जास्तीत जास्त वापर होण्यासाठी.

तसं पाहता, 'महाराष्ट्र शब्दकोशाचे' नऊ खंड मी गेली ४०-४५ वर्षं सातत्यानं वापरतो आहे पण ते खंड आता जवळजवळ १०० वर्षं जुने होतील. ज्ञानसरितेमधील नवनव्या प्रवाहांना सामावून घेण्यास 'संकल्पनाकोशा'ची गरज होतीच, ती आता पूर्ण झाली. शिवाय 'संकल्पनाकोश' हा निव्वळ शब्दकोश नाही. त्यामुळे त्याचं महत्त्व कैक पटींनी वाढतं.

'संकल्पनाकोश'चं यश कशात असेल तर जिज्ञासूंनी तो भरपूर वापरण्यात. पन्नासेक वर्षांनी जर याहीपेक्षा विस्तृत, मोठा, खोलवरचा नवा संकल्पनाकोश आला तर त्याचं पूर्ण श्रेय आजच्या या 'संकल्पनाकोशा'लाच जाईल हे निश्चित समजावं.

'संकल्पनाकोश'चं हे शिवधनुष्य एकट्यानं पेललं हे तर महद् आश्चर्यच म्हणावं. त्यांचं मन:पूर्वक अभिनंदन. 'ग्रंथाली'नंच तो प्रसिद्ध करावा यात मात्र आश्चर्य नाही. ग्रंथालीची ती ताकद आहेच. अशा अजोड प्रकाशनांमुळे ती आणखी पटीनं वाढते. वाढतच राहो या सदिच्छा.

– आनंद गुप्ते
अमृती, ७० श्रीकृष्णनगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर... मराठीत प्रथमच एक पाऊल पुढे**
**सुरेश वाघे लिखित 'संकल्पनाकोश'चे पाच खंड**




**संचाची मूळ किंमत ३२०० रु. सवलतीत २४०० रुपयांत अधिक टपाल खर्च १०० रु.**

॥ग्रंथाली॥ द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ • दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० • granthali02@gmail.com

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनि. स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.